# प्रकरण चार

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**4.291 सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ लावण्यात आलेल्या टँकरला जादा प्रदान करणेबाबत. (शासनस्तर)**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती जव्हारचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ लावण्यात आलेल्या टँकरला बंद कालावधीत प्रदान केलेले आहे. वाहन क्रमांक एमएच-09-7169, दिनांक 16/06/2014 ते 27/06/2014 पर्यंत टँकर पंचायत समिती आवारात उभा असल्याचे वाहन इंधन नोंदवहीत नमुद आहे. त्याचप्रमाणे वाहन क्रमांक एमटीएफ-7451, दिनांक 16/06/2014 ते 25/06/2014 पर्यंत टँकर पंचायत समिती आवारात उभा असल्याचे वाहन इंधन नोंदवहीत नमुद आहे. शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 06/05/2014 अन्वये फक्त पाणीपुरवठा केलेल्या टँकरच्या फेऱ्या देयकासाठी अनुज्ञेय राहतील. सदर टँकर बंद कालावधीतील प्रदान कोणत्या प्राधिकाराने केले याबाबत लेख्याआधारे स्पष्टीकरण सादर करावे. वसुली निश्चित करणे आवश्यक.

**4.292 मुरबे येथील नवीन जलकुंभपासून ते हनुमान मंदिरपर्यंत पाईप लाईन दुरुस्त करणे**. (**शासकीय निधी**)

**पंचायत समिती पालघर, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती पालघर यांनी प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 01/09/2014 अन्वये रक्कम रुपये 1,45,234/- इतका खर्च केलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे राजपत्र असाधारण भाग 1, दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 5 टक्के मूल्यवर्धित कराची रक्कम वसूल करावयाची असताना ती करण्यात आलेली नाही. सदरची रक्कम रुपये 14,883/- वसूल करून शासनखाती जमा करून अनुपालन दाखवावे.

2) विमा संचालनालय, यांचे पत्र क्रमांक 5.वि.वि./2093/सहविमा/जि.प./संकीर्ण/ अभियांत्रिकी/एम.2, दिनांक 27/06/2003 अन्वये 1 टक्के कामाचा विमा ठेकेदारांच्या देयकातून वसूल करणे आवश्यक आहे किंवा सदर ठेकेदाराने कामाचा विमा पावती सदर करावी अन्यथा ठेकेदाराकडून रक्कम रुपये 2,977/- वसूल करून अनुपालन दाखवावे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीए/2009/ प्र.क्र.108/कामगार/7/7अ,दिनांक 17/06/2010 नुसार बांधकामावरील खर्चाच्या 1 टक्के रक्कम कामगार कल्याण उपकराची वसूल करणे आवश्यक असताना, सदर रक्कम रुपये 2,977/- वसूल करून शासन खाती जमा करून अनुपालन दाखवावे.

4) कामाच्या नस्ती सोबत काम करण्यापूर्वीच्या व काम पूर्ण झाल्यानंतरच्या फोटो सोबत जोडण्यात आलेला नाही. याबाबत खुलासा करावा.

**4.293 केळवा मोरपाडा पाईपलाईन दुरुस्ती करणे**. (**शासकीय निधी**)

**पंचायत समित पालघर, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती पालघर यांनी पंचायत समितीने शासकीय निधीतुन केळवा पाईप लाईन दुरुस्त करणे या कामावर रुपये 2,42,560/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासहिता 1968 चे नियम 139 नुसार 10 टक्के पेक्षा जादा खर्च रुपये 22,290/- सदर खर्चाला सुधारीत प्राकलन करून त्यास मंजुरी घेणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) शासन विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे राजपत्र असाधारण भाग 1 दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत ठेकेदारकडुन 5 टक्के रक्कम मुल्यवर्धित कर वसुल करणे आवश्यक असताना सदर देयकांतुन रुपये 8,096/- एवढी रक्कम कमी वसुल केलेली आहे.

3) विमा संचालनालय यांचे पत्र क्रमांक प्र.वि.वि./2903/सहविमा/जि.पं./संकीर्ण/अभियांत्रिकी/एम.2 दिनांक 27/06/2003 अन्वये 1 टक्के रक्कम ठेकेदाराचे देयकातून वसूल करणे आवश्यक आहे. तथापि देयकातून 0.5 टक्के रक्कम वसूल केली आहे. तरी आता उर्वरित रक्कम रुपये 1,499/- वसूल करुन शासन फंडात भरणा करावी. व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

**4.294 हातपंप वसुलीबाबत. (जिल्हा परिषद फंड)**

**पंचायत समिती विक्रमगड, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समितीने माहे मार्च 2014 अखेर रुपये 70,116/- थकबाकी दर्शविलेली आहे. सन 2014-15 या वित्तीय वर्षातील मागणी रुपये 2,95,000/- अशी एकूण रक्कम रुपये 9,96,116/- असून माहे मार्च 2015 अखेर रक्कम रुपये 3,06,786/- वसूल केली आहे. मार्च 2015 अखेर थकबाकी रक्कम रुपये 6,89,330/- शिल्लक आहे. हातपंप वसुली ही प्रत्यक्षरित्या भोगवटाधारकाकडून वसूल करणे आवश्यक असताना, पंचायत समिती स्तरावर देय अनुदानातून वसूल केल्याने, ग्रामपंचायतीचे सचिव वर्गणी वसुलीच्या जबाबदारीतून मुक्त झाल्याचे आढळून येते. तरी सदर रक्कम प्रत्यक्ष उपभोक्ताकडून वसूल करण्याची कार्यवाही करणेत यावी.

**4.295 टँकर पाणीपुरवठ्यातील गंभीर अनियमितता.**

**पंचायत समिती दापोली, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती दापोली यांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा योजनेवर रुपये 4,52,137/- एवढी रक्कम खर्च केलेली आहे. पंचायत समितीने श्री.एस.जे.बर्वे या खाजगी वाहन चालकाच्या वाहनाद्वारे पाणीपुरवठा केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/ प्र.क्र.53/पापु14/मंत्रालय, मुंबई-32, दिनांक 30/04/2012 अन्वये अट क्रमांक 2 नुसार पाणीपुरवठा करणा-या टँकर / टँकरवरील टाकीची वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करण्याची कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

2) उपरोक्त दिनांक 30/04/2012 च्या शासन निर्णयानुसार टँकर / टँकरवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी 3000 ते 5000 लीटर त्यासाठी कमाल प्रतिदिन भाडे रुपये 198/- व कमाल प्रतिकिलोमीटर भाडे रुपये 2.50 असे नमूद असतांना पंचायत समिती दापोली यांनी रक्कम रुपये 3,81,572/- जादा अदा केलेली आहे.

3) तसेच, सन 2012-2013 मध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केलेला असून त्याची देयके सन 2014-2015 मध्ये उशिराने अदा केलेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.296 टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दिंडोरी, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, दिंडोरी सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात एकूण रक्कम रुपये 2,19,319/- रक्कम टँकर डिझेल व विहीर अधिग्रहीत यासाठी खर्चाचे लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 20, दिनांक 19/11/2015 रक्कम रुपये 12,816/- खर्च शिवशक्ती ऑटोमोबाईल, दिंडोरी यांना अदा केलेला आहे. टँकर क्रमांक एम. एच. 17 ऐ. 5745 करीता बिल क्रमांक 11513, दिनांक 31/05/2014 रुपये 6,408/- नुसार 100 लिटर डिझेल खर्च दर्शविलेला आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 06, दिनांक 28/10/2015 अन्वये टँकरच्या लॉग बुकची मागणी केली असता सदरचा टँकर डिझेल भरलेनंतर अपघातग्रस्त

झाल्याने पाणी पुरवठाकामी उपलब्ध होवू शकला नाही, असा खुलासा केलेला आहे. सदर टँकरकरीता केलेला डिझेल खर्च रक्कम रुपये 6,408/- संबंधिताकडून वसुल करून शासन सदरी भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/ 1005/प्र.क्र.3056/पापु/14, दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार पाणी उदभवाच्या ठिकाणाची नोंदवही त्यात प्रत्येक खेपेचे नोंदीसह लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/ 1005/प्र.क्र3056/पापु/14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनां नुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याव्दारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्या बाबत, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समिती मधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे असतांना केवळ ग्रामपंचायत कर्मचारी / ग्रामसेवक / सरंपच यांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्यात.

4) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे कडील परिपत्रक क्रमांक मशा/कार्या-2/ टंचाई/3/22862/6538/2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी / मा.तहसीलदार यांनी महिन्यात सर्व टँचाईग्रस्त गावांना भेटी देवुन तपासण्या करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) टँकरची पाणी धारण करण्याची लिटरमध्ये असलेली क्षमता उपअभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही. त्यामुळे मंजूर केलेल्या विहीत लिटर्सइतका पाणीपुरवठा झाल्याची खात्री होत नाही.

6) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी, किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करुन प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

7) संबंधित टँकरच्या प्रत्यक्ष प्रवासानुसार (स्पिडोमीटर प्रमाणे) धावसंख्या (रनिंग) त्याच्या लॉगबुकात नोंदविण्यात आलेली नाही. तर उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, दिंडोरी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे कि.मी. अंतराची नोंद मध्ये लॉगबुकात घेतलेली आहे. त्यामुळे संबंधित टँकरच्या स्पिडोमिटरमधील आकडे आणि प्रत्यक्ष टँकरने केलेल्या प्रवासाचे कि.मी. अंतर याची पडताळणी करणे शक्य होत नाही.

8) पुरवठादाराने मागणी केलेल्या देयकांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच मागणी करण्यात आलेल्या देयकांपैकी प्रदान केलेल्या देयकांचा स्वतंत्र तपशिल ठेवलेला नाही. त्यामुळे मागील वित्तीय वर्ष सन 2014-2015 मधील अनुदानाअभावी प्रलंबित राहिलेली देयके व त्यांची रक्कम, चालू वित्तीय वर्षात पुरवठादाराने मागणी केलेली एकूण देयके संख्या व त्यांची रक्कम तसेच सन 2013-2014 मध्ये मागील व चालू यापैकी नेमक्या किती देयकांची किती रक्कम प्रदान केली व कोणत्या देयकांची किती रक्कम अदयापि प्रदान करणे बाकी आहे याची तपासणी करता आली नाही.

9) ननाशी ते हनुमानवाडी चिकाडी विहिर अधिग्रहण कालावधी दिनांक 22/07/2014 पर्यंत असतांना लॉगबुक मध्ये दिनांक 23/07/2014 नोंद तसेच मारुती मंदीर ट्रस्ट ते तळेगाव वणी विहिर अधिग्रहण कालावधी दिनांक 02/06/2014 ते 22/07/2014 मात्र लॉगबुकमध्ये दिनांक 31/05/2014 ते 23/07/2014 वापर नोंद आहे. विहिर अधिग्रहणनुसार टँकर भाडे अदा होणे आवश्यक आहे.

**4.297 नैसर्गिक आपत्ती अणि निकडीचा पाणीपुरवठा योजनेबाबत (टंचाई)**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** नैर्सगिक आपत्ती आणि निकडीचा पाणीपुरवठा योजनेबाबत (टंचाई) पंचायत समिती, बागलाण सन 2014-2015 चे लेखापरीक्षण कालावधीत टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करणेसाठी रूपये 2,14,20,512/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी टंचाईची देयके खाजगी वाहनाचे फिरती नोंदवहीशी मेळ घेतांना प्रत्यक्ष कि.मी. आणि टँकरच्या खेपा यात तफावत आढळून आलेली आहे. खाजगी टँकरधारकाला अतिप्रदान झालेली रक्कम रुपये 96,144/- वसुल करुन योग्य लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

2) शासकीय वाहनांची मुळ फिरती नोंदवही लेखापरीक्षणाला उपलब्ध न झालेने फिरती कि.मी. आणि इंधानावरील खर्च याबाबत मेळ घेता आलेला नाही.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्रमांक 2372, दिनांक 04/12/2014 नुसार अनुदान वितरण पत्रात शासकीय टँकर इंधन, खाजगी भाडे विहीर अधिग्रहण इत्यादी साठीच खर्च करावे असे नमुद असतांना, प्रवासभत्ते देयक तसेच अतिकालीक भत्ते अशी एकूण रक्कम रुपये 13,16,147/- अदा करणेत आले आहेत.

4) पंचायत समितीने टँकर रुजू नोंदवहीत टँकरची नोंद घेऊन स्पीडोमिटर चालू असलेबाबत खात्री करणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवलेली नाही. तसेच, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र.52/पापु/14, दिनांक 12/05/2014 अन्वये देयकासोबत जि.पी.एस. प्रणालीच्या प्रती जोडलेल्या नसल्याने प्रदान रक्कम आणि फिरती याबाबत तंतोतंत मेळ घेता आलेला नाही.

5) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी, किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार / सार्वजनिक बांधकाम, मुख्य अभियंता यांचे अंतराबाबत संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करुन प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

6) खाजगी टँकर यांना देयके अदा करतांना शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र.53/ पा.पु./14,दिनांक 30/04/2012 अन्वये पाणी पुरवठा टँकर / ट्रक वरील पाणी टाकी यांची वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) खाजगी टँकरसाठी जिल्हाधिकारी यांचे आदेशांशिवाय इंधन पुरवठा केलेला आहे.

8) श्री. पोपट रा. खैरनार, श्री. गौरव खैरनार, श्रीमती लि.ल.खैरनार यांचे खाजगी विहिर अधिग्रहणाबाबत गटविकास अधिकारी व तहसिलदार तपासणी व प्रस्ताव उपलब्ध झाले नाही. संबंधितांना पाणी उपसा प्रदान रक्कम रुपये 42,000/- योग्य असल्याची सत्यता पटवावी.

**4.298 लेखा शिर्ष 2245 नैसर्गिक आपत्ती सन 2014-2015 मधील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती देवळा**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती देवळा सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात एकूण रुपये 58,27,953/- डिझेल इंजिन ऑईल, खाजगी टँकर भाडे व विहीर अधिग्रहीत यासाठी खर्च नोंद केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापा/ 1008/प्र.क्रमांक 48/पा.पु.14,दिनांक 11/06/2009 मधील अनुक्रमांक 2 नुसार पाणी पुरवठा करणा-या टँकर ची पाणी वाहन क्षमता परिवहन अधिकारी मार्फत प्रमाणीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष टँकर क्षमता बाबत पडताळणी करता आली नाही.

2) टँकरची वाहनचल नोंदवही प्रमाणीत नाही. तसेच विहीत नमुन्यातील नाही, इतिहास नोंदवहया, वाहनाचे (RTO) नोंदणी उपलब्ध झाले नाही. स्पीडोमीटर नुसार नोंदी घेतलेल्या नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष फे-यांचे अंतर लेखापरीक्षणात प्रमाणीत करता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/ 1005/प्र.क्र3056/पापु/14,दिनांक 24/01/2006 च्या शासन परिपत्रकातील मुद्दा क्रमांक 6 नुसार वेळीच्या वेळी टँकर गावात पोहचले असलेबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता कमिटीने नामनिर्देशीत केलेल्या 2 महिला सदस्य यांनी त्यांचे स्वाक्ष-या रोजवहीत केले नुसार सदर वाहनाच्या ट्रीपा व केलेल्या स्वाक्ष-या हया उपलब्ध असलेल्या वाहन चल नोंदवहीत तफावत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष फे-याबाबत लेखापरीक्षणात प्रमाणीत करता येत नाही.

4) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, यांचे कडील परिपत्रक दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी / मा.तहसीलदार यांनी महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देवुन तपासण्या करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/ 1005/प्र.क्र3056/पापु/14,दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार पाणी उद्भवाच्या ठिकाणीची नोंदवही ठेवून त्यात प्रत्येक खेपेचे नोंदीसह लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. खाजगी टँकर यांचे वापरातील धाव संख्या, धाव मोजणी यंत्रानुसार सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

6) विहीर अधिग्रहणासाठी रक्कम रुपये 7,03,600/- खर्च नोंद आहे. तथापि सदरच्या विहीरी अधिग्रहण बाबत मा.तहसीलदार यांचे आदेश, विहीरी वरील पाणी उचल नोंदवही, विहिर मालकाने शासकीय योजनेमधून लाभ घेतला नसल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) खाजगी टँकर साठी इंधन रक्कम रुपये 1,82,249/- एवढ्या रकमेचे भरले आहे. तथापि सदरचे इंधन भरण्यासाठी टँकर निहाय आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे इंधन खर्चाबाबत पडताळणी करता आली नाही.

8) सन 2014-2015 मध्ये इंधनावर एकूण खर्च रक्कम रुपये 1,82,249/- एवढा असुन सन 2014-2015 मधील खाजगी टँकर साठी भाडे रुपये 49,42,104/- एवढाच आहे. खर्चाचे वाहन चल नोंदवही, इतिहास नोंदवही, लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

9) खाजगी टँकरचे पाणीपुरवठा ठिकाण ते पाणी उचल ठिकाण या मधील अंतर सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत केल्याचे दाखले लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अंतराबाबत प्रत्यक्ष व प्रमाणीत अंतर याबाबत सत्यता पडताळणी करता आली नाही.

### 4.299 विना वापर पडुन असलेल्या वाहनाबाबत.

**पंचायत समिती मुक्ताईनगर, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 52) -** ग्रामिण पाणीपुरवठा उपविभाग, मुक्ताईनगर, यांचेकडील नमुना नंबर 33 जडसंग्रह नोंदवहीची पडताळणी केली असता, 21 दुचाकी मोटर सायकली विनावापर पडून आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग मुक्ताईनगर, यांचेकडे पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती करीता कर्मचा-यांना 21 दुचाकी मोटरसायकली क्षेत्र फिरस्तीकरीता पुरविण्यात आल्या होत्या. सदर मोटरसायकली कर्मचारी वापरत नसलेने दिर्घ काळापासुन विना वापर पडुन आहेत. तरी सदर वाहनांच्या निर्लेखनाबाबत कार्यवाही करुन, लिलावाव्दारे वाहने विक्री करुन, प्राप्त रक्कम योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

### 4.300 2245 नैसर्गीक आपत्ती पाणी पुरवठा खर्चाबाबत.

**पंचायत समिती भडगांव, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** टंचाईग्रस्त गावांना विहीर अधिग्रहणाव्दारे व शासकीय टँकरव्दारे पाणी पुरवठ्यावर रक्कम रुपये 1,46,250/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासकिय टँकर एम एच 19 / 9320 वर रक्कम रुपये 46,608/- इतका इंधनासाठी खर्च करण्यांत आलेला असुन लॉगबुकची मुळ प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

2) मा.जिल्हाधिकारी, यांचे मंजुरी आदेश अप्राप्त आहे.

3) मा.तहसिलदार, यांचे मंजुरी आदेशात मुदत नमुद नसुन आवश्यक त्या बाबींची गट विकास अधिकारी यांनी पडताळणी केलेली नाही.

4) मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, टंचाई शाखा परिपत्रक क्रमांक महाराष्ट्र राज्य/कार्या-2/22862/6538/2008,दिनांक 17/4/2008 परिच्छेद क्रमांक 6 नुसार स्पीडोमिटर चालु असुन रोज वहीतील नोंदी गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षांकित कराव्यात मात्र त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

5) उपरोक्त नमुद दिनांक 17/4/2008 या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 7 नुसार उदभव नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही.

6) उपरोक्त नमुद दिनांक 17/4/2008 या परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 8 नुसार आवश्यक त्या स्वाक्ष-या रोजवहीमध्ये घेण्यांत आलेल्या नाहीत.

7) टॅकरने गावांत ट्रीप निहाय वेळ व किलोमीटरची नोंद करणे आवश्यक असतांना एकत्रित किलोमीटर नोंद केली आहे.

8) शासकिय टँकर एम एच 19/9320 ची वाहन रोजनिशी लेखापरीक्षणास अप्राप्त असल्याने इंधनावरील खर्च रुपये 9,763/- वसुल करण्यांत यावा.

9) पंढरीनाथ हीरालाल पाटील यांना दिनांक 10/7/2014 ते 15/7/2014 या कालावधीतील विहीर अधिग्रहणाची विहीरीतील पाणिपुरवठा बंद असलेने जादा अदा करण्यांत आलेली रक्कम रुपये 2,400/- वसुल करण्यांत यावी.

10) गट विकास अधिकारी, यांचे पत्र क्रमांक 206, दिनांक 31/7/2014 अन्वये टॅकर एम एच 19/9320 कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यांत आला, मात्र त्यानंतरही त्यात रुपये 7,555/- चे डिझेल भरल्याचा खर्च नमुद करण्यांत आला असुन तो संबंधितांकडुन वसुल करण्यांत यावा.

**4.301 टंचाईग्रस्त ग्रामीण भागात (नैसर्गीक आपत्ती 2245) टँकरने पाणीपुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 47) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील टंचाईग्रस्त गावांना शासकीय व खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेला आहे. अर्धसमास पत्र 6,दिनांक 5/11/2015 अन्वये सदर खर्चाचा अनुषंगाने जिल्हाधीकारी यांचेकडील मुळ आदेश प्रस्ताव तसेच अनुषंगिक कागदपत्रे यांची मागणी केली असता सदर अभीलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. उपलब्ध लेख्यावरून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इंधन व पाणी पुरवठा टॅकरवर रूपये 24,09,891/-निवडक महिन्यात खर्च नोंदविलेला आहे. परंतु संबंधीत टॅकरची इतिहास नोंदवही लॉग बुकातील गोषवारे लेखापरीक्षणात उपलब्ध न केल्यामूळे झालेल्या खर्चाची खात्री करता आली नाही.

2) स्पीडा मिटर प्रमाणे प्रत्यक्ष उदभव ते टंचाईगांव हे अंतर लॉग बुक उलपब्ध नसल्याने खात्री करता आलेली नाही.

3) पाण्याच्या खेपा टाकणेबाबत शासन परिपत्रक क्रमाक टंचाई/3303/प्र.क्र.374/पफ 14, दिनांक 08/12/2003 नुसार संबंधीत ग्रामीण पाणी पुरवठा समितीच्या दोन महिला सदस्यांच्या सह्या लॉग बुकात घेणेआवश्यक आहे.

4) गटविकास अधीकारी / तहसीलदार यांनी लॉगबुकाची अचानक तपासणी करून खेपा व प्रत्यक्ष अंतर तपासुन लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदवीणे आवश्यक आहे. महसुल यंत्रनेने टँकरच्या किती खेपा टाकावयाच्या याबाबत आदेश उपलब्ध झालेला नाही.

5) विहीर व पाणीपुरवठा उदभव अधीग्रहणाबाबत विहीत केलेली नमुना नोंदवही तसेच अधिग्रहण ठिकाणापासुन प्रत्यक्ष टंचाई अंतर, उपअभियंता यांनी तपासणी करून प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

एकुण बील रक्कम रूपये 28,65,342/- हे बील जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाकडे सादर केलेले असल्याने लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

**4.302 नळ पाणी पुरवठा योजना नागेश्वर विद्यालय ते जगताप वस्ती वरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** चिलवडी तालुका कर्जत येथे नळ पाणी पुरवठा वितरण व्यवस्था करणे कामी मक्तेदार सरपंच ग्रामपंचायत चिलवडी यांना कामाचा मक्ता देणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अगोदर अस्तित्वात असलेली जुनी पाईप लाईनचे जुने पाईप व व्हॉल्व यांचे काय केले याचा मोजमाप पुस्तिकेत नोंदी नाहीत.

2) सदर कामासाठी खोदकाम केलेनंतर पाईप बुजविणेसाठी गौण खनिजाचा वापर परिमाण 304.92 X 70.67 = रुपये 21549/- गौण खनिजापोटी वसुल करणे आवश्यक होते. तथापि, देयकात रॉयल्टीची रक्कम कपात केलेली नाही. ती वसूल करावी.

3) पाईप लाईन काम पूर्ण झालेनंतर त्याची हायड्रोलीक चाचणी घेतलेली नाही.

4) दोष निवारण कालावधी हा 1 वर्षाचा असतांना करारनाम्यात फक्त 2 महिने नमूद केला आहे व थर्ड पार्टी तपासणी अहवाल दप्तरी नाही.

5) कामाचे ठिकाणी माहिती फलक लावणेबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद नाही.

6) सदर काम करणेस ग्रामपंचायत तांत्रिक दृष्टया सक्षम नसतांनादेखील केवळ अनुदान व्यपगत होऊ नये याच उदËदेशाने कामाचे वाटप केलेचे आढळुन येते.

**4.303 टंचाईग्रस्त ग्रामीण भागात (नैसर्गिक आपत्ती 2245) टँकरने पाणी पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती अकोले, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 53) -** सदर खर्चाच्या लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देणेसाठी अर्धसमास पत्र 6,दिनांक 14/09/2015 अन्वये जिल्हाधिकारी व महसुलदार यांचेकडील मुळ प्रस्ताव अप्राप्त होते. उपलब्ध अभिलेख्यावरून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इंधन व पाणीपुरवठा उदभव अधिग्रहणावर रूपये 12,85,388/- खर्च नोंदविलेला आहे. परंतु संबंधीत टॅकरची इतिहास नोंदवही लॉगबुकावरील गोषवारे लेखापरीक्षणात उपलब्ध न झालेने झालेला खर्चाची खात्री करता आली नाही.

2) स्पीडामीटर प्रमाणे प्रत्यक्ष उदभव ते टंचाई गाव अंतर लॉगबुक उपलब्ध नसलेने खात्री करता आली नाही.

3) गटविकास अधिकारी / तहसीलदार यांनी लॉगबुकाची अचानक तपासणी करून खेपा व प्रत्यक्ष अंतर तपासून लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे.

4) महसुल यंत्रणेनी टँकरच्या किती खेपा टाकावयाच्या याबाबतच्या आदेश उपलब्ध झालेला नाही.

5) विहीर व पाणीपुरवठा उदभव अधिग्रहण ठिकाणापासून प्रत्यक्ष टंचाई अंतर उपअभियंता यांनी तपासुन प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

6) प्रवास भत्ता देयकासाठी खर्च रूपये 1,39,363/- इतका नोंदविलेला आहे. प्रवासाचा उद्देश व नियमाप्रमाणे अचुक प्रवासभत्ता व तासांची परीगणना नमुद केलेले नाही. त्यामुळे केलेला खर्च अचुक असल्याची खात्री पटलेली नाही.

**4.304 लेखा परीक्षणास खाजगी टँकर भाडे प्रदानाबाबत लेखे अभीलेखे सादर न करणेबाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती राहाताच्या सन 2014-15 या वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी टंचाई शाखेतंर्गत खालीलप्रमाणे खाजगी टँकर भाडे प्रदान करण्यात आल्याचे दिसून आले.

खाजगी टँकर भाडे प्रदान करण्यात आल्याने या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 5,दिनांक 05/11/2015 अन्वयेविहीर अधीग्रहण आदेश उद्भव रजिस्टर वाहनाचे लॉगबुक, खाजगी टॅकर मंजुरीचे आदेश, सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणितकेलेले अंतर, इत्यादी लेखे अभिलेख्यांची मागणी केली असता, झालेल्या खर्चासंदर्भात कोणतेही लेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. सदर लेख्याअभावी खर्चाची सत्यता पडताळणी करता येत नाही. लेखापरीक्षण अभावी झालेला खर्च मान्य करता येत नाही.

**4.305 पाणीटंचाई निवारणार्थ विहीर अधिग्रहण व टँकरने पाणीपुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 69) -** पंचायत समिती जुन्नर लेखापरिक्षण 2014-15 या कालावधी पाणी पुरवठा विभागाने पाणीटंचाई निवारणार्थ विहीर अधिग्रहण व टँकरने पाणी पुरवठा केलेल्या दप्तराची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्रक्रं.53/ पापु-14,दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रं. 2 अन्वये तसेच करारनाम्यातील अट क्र.15 अन्वये वाहनाच्या क्षमते बाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल तसेच,खाजगी टँकर्स वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे. मात्र पाणी टंचाईसाठी वापरलेल्या खाजगी टँकर अजित दादा सहकारी वाहतूक संस्था बारामती यांचे कडील वाहनाचे पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणीत केलेले नाही.

2) टँकरचे आरसीटीसी दप्तरी उपलब्ध नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्रक्रं.53/ पापु-14, दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रं. 2 अन्वये खाजगी टँकर्स वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित केलेले नसताना प्रति टँकर 5000, 12000, 20000 (टन) क्षमतेचे गृहीत धरुन देयके काय आधारे अदा केली. रस्त्यावरुन त्याच प्रमाणे ज्या रोडवरुन टँकर्सने पाण्याची वाहतुक केली जाते त्या रस्त्याच्या वाहन क्षमतेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेणेत आले नाही. त्यामुळे योग्य प्रमाणामध्ये पाणी पुरवठा झालेची पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासननिर्णय क्रमांक टंचाई 1008/प्रक्रं.05/ पापु-14,दिनांक 25/03/2008 मधील अट क्रं 2 अन्वये विहीर मालकाशी कायदेशीर करार करण्यात यावे. मात्र या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. प्रस्तूत प्रकरणी विहीर अधिग्रहण केले त्या मालकाचे करारपत्र दप्तरी नाही.

5) अटी व शर्ती नुसार खाजगी टँकरचे लॉगबुक, खेपा बाबत ग्रामसेवक, महिला सदस्य, यांचे टँकर पुरवठा केल्याचे खेपेंची स्वाक्षरी असलेली पोहोच गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन देयका सोबत जोडणे आवश्यक असताना गट विकास अधिकारी यांनी सदर पोहोच प्रमाणित केलेली नाही.

6) पाणीपुरवठा टंचाई गावातील रस्त्याचे पाणी स्त्रोत ते पुरवठा करण्याचे ठिकाणे यातील अंतराचे प्रमाणपत्र उप अभियंता बांधकाम विभाग (इ व द) जुन्नर यांचे घेतलेले आहे. सदर बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांचे रस्त्याच्या अंतरा बाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

7) आदेश कवी/578/2014, दिनांक 30/03/2014 नुसार टंकरचे टाकीची क्षमता X 1.57 = एक दिवसाचे भाडे (14000 X 1.57 = 21980/-) टँकरची क्षमता X 2 X किलोमीटर = वाहतूक खर्च (14 X 2.28 फिरतीचे 1 किलोमीटर) वरील सूत्राप्रमाणे एकूण रुपये 15,78,890/- इतका खर्च केला आहे. परंतु टँकरचे टाकीची क्षमता ही प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O.) यांचे कडून प्रमाणित करून घेतलेली नाही त्यामुळे सदरचा खर्च नियमबाहय आहे. त्यामुळे खाजगी टंकरचे अदाई वर केलेला खर्च रुपये 15,78,890/- लेखापरीक्षणास अमान्य करणेत येत आहे.

**4.306 टँकरने पाणी पुरवठा केले बाबतच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 53) -** टँकरने पाणी पुरवठा करण्या-या नस्तीच्या अनुषंगाने खर्च रक्कम रुपये 99,204/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन**,** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 3099/प्र.क्रं.14/पापु-14,दिनांक 01/02/1999 अन्वये टँकर मंजूरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून, सदर विभागाचे दिनांक 31/03/2006 च्या शासन निर्णयान्वये टँकर मंजूरीचे अधिकार तहसिलदार यांना पुर्नप्रदान करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर विभागाचे शासन निर्णय क्रमांक टंचाई-1003/प्र.क्रं.364/पापु-14/ दिनांक 23/12/2003 अन्वये उपविभागीय अधिकारी-यांनी टंचाईसाठी लावलेल्या टँकरला 10 दिवसाचे आत कार्योत्तर मंजूरी घ्यावयाची आहे. मात्र याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. खाजगी टँकरचे अधिग्रहण आदेश दप्तरी नसल्याचे दिसून आले असून तरीही रककम रुपये 99,204/- नियमबाहयपणे अदा करण्यात आली आहे.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/ प्र.क्रं.53/पापु-14, दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रमांक 2 अन्वये खाजगी टॅंकर्स वरील टाकीची वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी पाणी टंचाईसाठी वापरलेल्या खाजगी टॅंकर हर्षवर्धन पाटील सहकारी वहातूक संस्था, मर्या. इंदापूर यांचे वाहनाचे पाणी वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित केलेले आर.सी.टी.सी.दप्तरी नाही. आर.सी.टी.सी.उपलब्ध नसतांना प्रति टॅंकर 12000 टन टाकीची पाणी वहन क्षमता या प्रमाणे रक्कम अदा केली आहे. तरी वहनक्षमतेचे प्रमाणपत्र नसतांना वहन क्षमता 12000 टन गृहीत धरुन रक्कम कशी व काय आधारे अदा केली आहे, वाहतुकीचे रस्ते तेवढे क्षमतेचे, वजनाचे, वहन वाहतूक करणे योग्य होते किंवा कसे याचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/ प्र.क्रं.05/पापु-14, दिनांक 25/03/2008 मधील अट-2 विहीर मालकाशी कायदेशीर करार - स्टॅम्प पेपरवर करार केलेला नाही.

4) खाजगी टॅंकरचे लॉगबुक, खेपाबाबत प्रमाणपत्रावर महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. तसेच काही पाणी पुरवठा खेपाबाबत लॉगबुकावर सरपंच/ग्रामसेवक यांच्या सहया नाहीत. त्यामुळे खेपांची पडताळणी करता आली नाही.

5) वरील देयकातुन सेवाकर अधिसुचना 2/94 एसटी,दिनांक 28/06/1994 व अधिसूचना 47/2012 एसटी,दिनांक 28/09/2012 अन्वये सेवा पुरवठा करणा-या संस्थाच्या देयकावरील 70 टक्के रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवाकर कपात व भरणा केल्याबाबत तपशिल नाही.

**4.307 पाणी टंचाई अंतर्गत खाजगी टॅकरने पाणीपुरवठा व त्यामधील अनियमितता.**

**पंचायत समिती इंदापूर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती, इंदापूर यांचेकडील रक्कम रुपये 19,81,966/- पाणी टंचाई अंतर्गत खाजगी टॅकरने केलेला पाणीपुरवठा याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक पाणी पुरवठा विभाग टंचाई 1013/प्र.क्र.364/पापु-14, दिनांक 23/12/2003 अन्वये उपविभागीय अधिका-यांनी टंचाईसाठी लावलेल्या टॅकरचे अधिग्रहण मंजुरी आदेश पाणी टंचाईग्रस्त गावांचे मंजुर प्रस्ताव दप्तरी नाहीत.

2) वाहनाचे पाणी वहनक्षमता आर.टी.ओ.मार्फत प्रमाणित केलेले आर.सी./टी.सी.दप्तरी नाही.

3) गाववाडी/वस्तीपासून 1.5 किलोमीटर च्या परीसरात पिण्याच्या पाण्याचा उद्भव नाही याची तहसीलदार व गट विकास अधिकारी यांनी खात्री करून स्वाक्षरी केलेली कागदपत्रे दप्तरी नाहीत.

4) विहीर मालकांचे विहीर अधिग्रहण केलेबाबत करारपत्र व विहिरीतील पाणीसाठ्याचे प्रमाणपत्र नाही.

5) शासकीय टॅकर चे मूळ लॉगबुक नसल्याने अदा केलेल्या टॅकरच्या खेपांची संख्या व अंतर, टॅकरची इंधनबिले, वाहन चालकाच्या प्रवास व अतिकालिक भत्त्याची बिले यांची पडताळणी करता आलेली नाही.वाहतूक संस्थेशी केलेल्या करारनाम्याची प्रत दप्तरी नाही.

6) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णाय क्रमांक टंचाई-2012/ प्र.क्र.53/पापु-14,दिनांक 30/04/2012 मधील अट क्रमांक 2 अन्वये खाजगी टॅकर / ट्रक वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित केलेली नाही.

6) जी.पी.एस.प्रणाली बसविलेची कागदपत्रे दप्तरी नाहीत.

7) पंचायत समितीचे शासकीय अनुदानातून पूर्ण केलेल्या जवाहर विहिरी प्रथम अधिग्रहित करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) शिल्लक अनुदान रक्कम रुपये 87,85,034/-शासनास जमा केले नाही.

9) संबंधित गावाचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, महिला बचत गटाचे प्रतिनिधी व काही ग्रामस्थ यांची टॅकरने पाणीपुरवठा केलेबाबतची स्वाक्षरी असलेली पोहोच गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून देयकासोबत जोडालेली नाही.

10) कराराची सत्यप्रत दप्तरी नाही.

**4.308 पाणी टंचाई निवारणार्थ विहिर अधिग्रहण व खाजगी टँकर भाडे देयकातील उणीवाबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 64) -** पंचायत समिती बारामती यांनी शासन निधीमधून पाणी टंचाई निवारणार्थ विहिर अधिग्रहण व खाजगी टँकर यांच्यासाठी प्राप्त अनुदान रक्कम रुपये 98,06,000/- मधुन रक्कम रुपये 88,27,773/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्रक्र 53/पापु-14, दिनांक 30/04/2012 या आदेशामधील अट क्रमांक 2 अन्वये व करारनाम्यातील अट क्रमांक 15 अन्वये वाहनाच्या क्षमतेबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल असे नमुद असतांना खाजगी टँकरवरील टाकीची वाहन क्षमता प्रादेशिक परिवहन विभागाकडून प्रमाणित करणे आवश्यक असतांना तसे प्रमाणित केलेले नाही. असे प्रमाणित केलेले नसतांना प्रती टँकर 12000 किंवा 14000 लिटर गृहीत धरुन देयके अदा केलेली आहेत.

2) नमुद सात टँकरचे आरसीटीसी दप्तरी उपलब्ध न झाल्याने योग्य क्षमतेने पाणी पुरवठा केल्याची तपासणी करता आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/ प्रक्र05/पापु-14, दिनांक 25/03/2008 मधील अट क्रमांक 2 अन्वये विहिर अधिग्रहनाबाबत विहिर मालकाशी कायदेशीर करार करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही व असे करार दप्तरी नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 3099/ प्रक्र14/पापु-14,दिनांक 01/02/1999 अन्वये टँकर मंजुरीचे अधिकार माननीय जिल्हाधिकारी यांना असुन या विभागाच्या दिनांक 31/03/2006 च्या शासन निर्णयानुसार टँकर मंजुरीचे अधिकार तहसिलदार यांना पुर्नप्रदान केले आहे. याच विभागाचा टंचाई 1003/प्रक्र364/पापु-14,दिनांक 23/12/2003 अन्वये उपविभागीय अधिकारी यांनी टंचाईबाबत लावलेल्या टँकरला 10 दिवसांच्या आत कार्योत्तर मंजुरी घ्यावयाची असतांना अशी कार्यवाही झालेली नाही. खाजगी टँकरचे अधिग्रहण आदेश दप्तरी नसतांना रक्कम अदा केलेली आहे. अधिग्रहण आदेश लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

5) विहित अटी व शर्तीनुसार खाजगी टँकरचे लॉगबुक, खेपांबाबत ग्रामसेवक, महिला सदस्य यांची टँकर पुरवठा केल्याचे खेपेची स्वाक्षरी असलेली पोहच गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना सदर पोहच प्रमाणित केलेली नाही.

6) पाणी पुरवठा टंचाई गावांमधील रस्त्याचे अंतराचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांचे एवजी उपअभियंता बांधकाम विभाग(इ व द) बारामती यांचे घेतलेले आहे.

7) लेखाशिर्ष 2245 - 2185 - 31 मधील अनुदान रक्कम रुपये 11,31,537/- एवढी अखर्चित आहे व लेखाशिर्ष 2245 - 0093 - 31 मध्ये 1,53,310/- एवढा जादा खर्च केला आहे. त्यामुळे नियमबाह्यता झाली आहे.

8) विविध वाहनाच्या लॉगबुक रकान्यातील नोंदी नसणे, वाहनाचे धावमीटर बंद असणे व अटी व शर्तीनुसार खाजगी टँकरने पुरवठा केलेबाबत ग्रामसेवक महिला सदस्य इत्यादींची स्वाक्षरी नाही.

**4.309 पाणी टंचाई अंतर्गत खाजगी टेंकरने पाणी पुरवठा व त्यामधील अनियमितता.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती पुरंदरचे सन 2014-15 चे पाणी पुरवठा विभागाकडील पाणी टंचाई निवारणार्थ टँकरने पाणी पुरवठा खर्च रक्कम रुपये 39,42,005/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छताविभाग, शासननिर्णय क्रमांक 3099/प्र.क्र.14/पापु-1, दिनांक 01/02/1999 अन्वये टैकर मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असुन सदर विभागाचे दिनांक 31/03/2006 च्या शासन निर्णयान्वये टँकर मंजुरीचे तहसीलदार यांना पुर्नप्रदान करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सदरविभागाचे

शासन निर्णय क्रमांक टंचाई 1013/प्र.क्र.364/पापु-14, दिनांक 23/12/2003 अन्वये उपविभागीय अधिका-यांनी टंचाईसाठी लावलेल्या टँकरला 10दिवसांचे आत कार्योत्तर मंजुरी घ्यावयाची आहे. प्राप्त टँकर क्रमांक एम.एच.12/5429 व 9716 या खाजगी टँकरचे अधिग्रहणाचे मंजुरी आदेश दप्तरी नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र 53/पापु-14,दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्र. 2 व दिनांक 06/04/2013 च्या करारातील अट क्र.3 नुसार खाजगी टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वाहन क्षमता-आरटीओ मार्फत प्रमाणीत करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. मात्र प्रस्तुत प्रकरणी पाणी टंचाई साठी वापरलेल्या खाजगी टँकर मे अजितदादा मोटार वाहतुक संस्था बारामती यांचे वाहनाचे पाणी वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणीत केलेले आर.सी./टीसी.दप्तरी नाही.

3) प्रशासकीय मान्यतेमधील अट क्र 1 अन्वये गाव वाडी / वस्ती पासुन 1.5कि.मी. च्या परीसरात पिण्याच्या पाण्याचा उद्रभव नाही. याची तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी खात्री करावी.असे असतांना मात्र स्वाक्षरी केलेबाबतची कागदपत्रे दप्तरी नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्व्च्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/ प्र.क्र.05/पापु-14,दिनांक 25/03/2008 मधील अट क्र.2 नुसार विहीर मालक श्री. चंद्रकांत सुधाकर डोंबे यांचे करारपत्र नाही.

5) जिल्हाधिकारी पुणे यांनी खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी निविदा काढुन पुंरदर तालुक्यासाठी मे.अजितदादा मोटार वाहतुक संस्था, बारामती यांची निविदा मंजुर करुन जिल्हाधिकारी कार्यालय पुणे रोजगार हमी योजना शाखा यांचे पत्र क्रमांक टंचाई/वि/570/2014, दिनांक 30/06/2014 अन्वये दर कळविण्यात आले होते. परंतु सदर निवीदेचा कालावधी कधीपर्यंत आहे. तसेच संबधीत संस्थेशी केलेल्या कराराची सत्य प्रत उपलब्ध झाली नाही.

6) शासकीय टँकरचे मूळ लॉगबुक नसल्याने अदा केलेली टँकरची इंधन बिले व वाहन चालकाच्या प्रवास व अतिकालिक भत्ते बिले यांची पडताळणी लॉगबुक अभावी करता आली नाही.

7) करारातील अटीनुसार केवळ 12,10,व 7.5 मे.टन क्षमतेपर्यंतचे टँकर पुरवू असे असताना 1100 लिटर (11मे.टन) क्षमता असलेल्या टँकरची बिले मे.अजितदादा सह. मोटार वाहतुक संस्था मर्यादीत बारामती यांना अदा केल्यामुळे सबब सदर जादा आदा रक्कम वसूल करुन शासनास भरणा करावी.

8) मे.अजितदादा सह. मोटार वाहतुक संस्था मर्यादीत, बारामती यांचे खाजगी टँकर वाहन क्र.MH-43E 1025 चे लॉगबुक क्र.11 वाहन क्र. MH-12AQ 3805 चे लॉगबुक क्र.7 चे वाहन क्र. MH-AQ 6875 चे लॉगबुक क्र. 10 ची प्रत्यक्षात अंतर व खेपा यांची प्रमाणके बिले यानुसार प्रत्यक्षात पडताळणी करता लॉगबुक वरील व जी.पी.एस. प्रणाली तील पत्रातील अंतरापेक्षा दुप्पट अंतर यानुसार प्रमाणके व बिलात नोंद करुन रक्कम रुपये 74,760/- जादा प्रदान केलेली रक्कम वसुली करुन भरणा करावी.

**4.310 टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहण व टँकर भाडे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती खंडाळा, जिल्हा परिषद सातारा यांनी टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहण, टँकर भाडे व इंधनासाठी एकूण रक्कम रुपये 6,03,859/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी, सातारा यांनी आदेश क्रमांक पाणीटंचाई/कावि/287/2014, दिनांक 03/05/2014 अन्वये टँकरसाठी मे. प्रदीप ट्रान्सपोर्ट तर्फे श्री. प्रदीप बापुसाहेब धुमाळ, रा. सोनके यांची कमी दराची निविदा मंजूर केली आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार तहसिलदार/गटविकास अधिकारी यांनी खेपा मंजूरीची कार्यवाही केली नाही. तसेच प्रवासाची नोंदवही आढळून आली नाही.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 14 नुसार टँकर विनाकारण अथवा कोणत्याही कारणाने उभा राहिल्यास आकारणी केली जाणार नाही. तथापि त्याबाबत तपशिल आढळून येत नाही.

3) खाजगी टँकर रुजू होण्यापूर्वी ठेकेदारांनी वाहन क्षमतेच्या प्रमाणपत्राची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेली प्रत सादर करणे आवश्यक असता ती केली नाही. तथापि भाडयाचे दर टनामध्ये असल्याची

उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, फलटण यांनी लिटरमध्ये दिलेली प्रमाणपत्रे नियमबाहयपणे मान्य करुन रकमा प्रदान केल्या आहेत. त्यामुळे जादा अदाईची शक्यता नाकारता येत नाही.

4) करारनाम्यातील अटींनुसार लॉगबुकातील धावसंख्या सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडून प्रमाणीत केली नाही.

5) फिडींग पॉईंटवर कर्मचारी नियुक्ती नाही. तसेच फिडींग रजिष्टर ठेवले नसल्याने भरलेल्या पाण्याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) पाईंटवर भरलेल्या व वाटप केलेल्या पाण्याचे परिमाणाची कोठेही नोंद नाही. त्यामुळे पाण्याच्या तुटीबाबत पडताळणी करता आली नाही.

7) शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, खंडाळा यांनी संबंधीत ठिकाणी भेटी देऊन अभिप्राय नोंदले नसल्याने नियंत्रण ठेवल्याचे दिसून येत नाही.

8) सन 2013-14 मध्ये अनुदान शिल्लक असतांनाही सन 2013-14 च्या रकमा रुपये 56,100/- सन 2014-15 मध्ये सादर केली असल्याने दुबार प्रदानाची शक्यता आहे. टँकर बिले पाहता कराडवाडी येथून एकही टँकर भरणा केलेला नसतांना विहीर अधिग्रहण रकमा आदा केल्या आहेत.

9) प्रमाणक क्रमांक क 39, दिनांक 22/09/2014 रक्कम रुपये 21,447/- अन्वये आदा रक्कम मे. कमल संघवी पेट्रोलीयम, लोणंद यांना प्राप्त झाल्याची पोहोच पावती उपलब्ध नाही.

10) वाहन क्रमांक एम.एच.11 एम. 4013 कालावधी 11/7/2014 ते 23/7/2014 साठी रुपये 54,338/- आदा केले आहेत. सदर बिल पाहाता लिंबाचीवाडी ते शिरवळ हे पाणी भरण्यास योग्य व जवळचे (36 किलोमीटर) ठिकाण असतांनाही पाडेगांव (86 किलोमीटर) येथून टँकर भरणा केल्याने जादा आदाई केली आहे. ती वसुली करणे आवश्यक आहे.

11) वाहन क्रमांक एम.एच.09 -9954 व एम.एच.11 -2975 या वाहनांचे अंतर पासुन ते पर्यंत न नोंदता मोघमपणे नोंदले आहे. त्यामुळे अंतर व आदा केलेले भाडे योग्य नाही.

तसेच प्रमाणक क्रमांक 6, दिनांक 03/02/2015 रक्कम रुपये 18,350/- पहाता शिरवळ येथे आदेशाविना पाण्याचे वाटप केले आहे. सदर रक्कम वसुली करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे लोणंद शहरासाठी मंजूर पाडेगांव या ठिकाणाऐवजी शिरवळ येथून पाणी आणल्याने जादा आदाई झाली आहे ती वसुली करणे आवश्यक आहे.

12) करारनाम्यातील अट क्रमांक 29 नुसार प्रत्येक ट्रॅक्टरला GPS Based Water Tanker Tracking Maintaining System ठेकेदारांनी बसवली नसल्याने अटींनुसार त्या फेऱ्या बनावट ठरतील व रक्कम अनुज्ञेय ठरणार नाही. असे असतांना ती माहिती संकलित न करता रकमा नियमबाहयपणे प्रदान केल्या आहेत.

13) शिल्लक रक्कम रुपये 2,60,410/- तपशिल पहाता टँकरमध्ये पाणी भरण्यासाठी विहीर/विद्युतपंप, इंजिन यांचे भाडे आदा केले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष पाणी पुरवठा केल्याबाबत साशंकता निर्माण होते. टँकर भाडे खर्च वसुली करणे आवश्यक आहे.

**4.311 शासकीय टँकरद्वारे इंधन भरण्याकरीता केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती माण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती माण जिल्हा परिषद सातारा यांनी टंचाईतून प्राप्त अनुदानातून शासकीय टँकरला इंधन भरण्याकरीता रुपये 16,83,343/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इंधनाची देयके मे. जगदाळे पेट्रोलियम, दहिवडी यांना आदा केलेली आहेत. वाहनांची लॉग बुके तपासली असता उपविभगीय अभियंता, बांधकाम उपविभाग दहिवडी यांनी प्रमाणित करुन दिलेल्या अंतरापेक्षा 3,863 किलोमीटर अंतर लॉगबुकाला जादा नोंदले आहे. लॉगबुकानुसार इंधन सरासरी 3 किमी प्रतिलिटर व इंधन दर रुपये 24 प्रतीलिटर आहे. त्यामुळे जादा अंतरासाठी जादा झालेला खर्च रुपये 69,534/- वसुली करणे आवश्यक आहे.

2) लॉगबुकामधील नोंदी खेपानिहाय घेतल्या नाहीत. तसेच ग्रामसेवक/सरपंच/तलाठी यांच्या पोहोच खेपानिहाय घेतलेल्या नसल्यामुळे लॉगबुकमध्ये नोंदविलेल्या खेपा योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

**4.312 टंचाई निवारणाअंतर्गत टँकर भाडे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती खटाव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती खटाव (वडूज) यांनी टंचाई निवारणाअंतर्गत टँकर भाडे आदाईसाठी रक्कम रुपये 99,66,534/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी, सातारा आदेश क्रमांक पाणी टंचाई/कावि/287/2014, दिनांक निरंक अनुसार कार्यारंभ आदेश दिला आहे. तहसिलदार/प्रांत अधिकारी यांनी कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी माहे 5/2014 मध्ये आदेशाशिवाय पाणी पुरवठा खेपा केल्या आहेत. यास्तव त्यावरील खर्च रुपये 1,68,479/- मान्य करता येत नाही तो वसुल करणे आवश्यक आहे.

2) टँकर क्रमांक एम.एच.16 ए.ई. 6182 ची आरसी बुकनुसार वाहतुक क्षमता 16,560 kg इतकी आहे. तथापि सदर क्षमतेपेक्षा जादा वाहतुक केल्याने ठेकेदारास रक्कम रुपये 2,48,683/- जादा आदा झाले आहे ती वसुली करणे आवश्यक आहे.

3) वाहन क्रमांक एम.एच.04 ए.एच. 3784, एम.एच.11 ए.एम.6496 व एम.एच.12 6730 ची आर.सी बुक उपलब्ध नसल्याने वाहतुक क्षमता व ठेकेदारस प्रत्यक्ष प्रदान केलेल्या खर्चाचा ताळमेळ घेता आला नाही. आर.सी. बुक उपलब्ध करता प्रदान योग्य असल्याबाबत पुर्तता दाखवावी. अन्यथा जादा प्रदान वसुली आवश्यक आहे.

4) एकूण 5 वाहनांचे प्रत्यक्ष धावसंख्येपेक्षा जादा धावसंख्येच्या रकमा आदा केल्या आहेत. त्यामुळे रुपये 14,337/- जादा आदाई वसुली करणे आवश्यक आहे.

5) काही वाहनांच्या वाहतुक क्षमतेच्या प्रती उपलब्ध नाहीत. उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, वडूज यांनी दिलेल्या क्षमतेची प्रमाणपत्रे लिटरमध्ये असून भाडयाचा दर टनामध्ये असतांना नियमबाहयपणे मान्य केलेले आहे. त्यामुळे टँकर क्षमतेपेक्षा जादा रकमेचे प्रदान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) फिडींग पॉईंटवरील फिडींग रजिस्टर उपलब्ध नसल्याने संबंधित लॉगबुकाशी ताळमेळ घेता आला नाही.

7) प्रमाणक क्रमांक 68, दिनांक 11/09/2014 रुपये 22,98,897/- पहाता लॉगबुकातील मासिक गोषवारा, अंतर प्रमाणपत्र व टँकर क्षमता प्रमाणपत्रावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

8) वाहन क्रमांक एम.एच.12 आर. 8162 हे वाहन 1995 सालातील म्हणजेच 20 वर्षापुर्वीचे आहे. सदर वाहनाचा विमा पॉलीसी खेपा मंजूरीपुर्वीची असणे आवश्यक आहे. सदर वाहन एकूण 13 दिवस प्रत्येक दिवशी 398 किमी धावण्याच्या नोंदी लॉगबुकावर नमूद आहेत. परिसरातील रस्त्याची स्थिती पाहता 20 वर्षापूर्वीचे वाहन प्रतिदिन 398 किमी धावणे शक्य नाही. नोंदी योग्य असल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

9) टँकरनिहाय नोंदवही अथवा अन्य उपायांमार्फत टँकर विनाकारण उभा असल्याचे तपशिलासह प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांना सादर केल्याचे आढळले नाही.

**4.313 टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहण व टँकरभाडे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती जावली, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती जावली यांनी टंचाई निवारणासाठी एकूण रक्कम रुपये 22,26,588/- इतका खर्च केलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टँकर फेरीच्या खेपा तहसिलदार / गटविकास अधिकारी यांनी मंजूर करणे आवश्यक असतांना त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. तसेच टँकरच्या प्रवासाची नोंदवही गटविकास अधिकारी यांचेकडे आढळून आली नाही.

2) टंचाईग्रस्त गावांना 12 टँकरद्वारे पाणी पुरवठा केला गेला तथापि टँकर मंजूरी आदेशात कोणत्या क्षमतेच्या तसेच कोणत्या क्रमांकाचा टँकर कोणत्या गावासाठी निश्चित केला याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही.

3) टँकर पाणी पुरवठयासाठी रुजू होण्यापूर्वी त्याची वाहन क्षमता, नोंदणी प्रमाणपत्रातील क्षमता याबाबतची सक्षम अधिकाऱ्याकडून तपासणी करुन प्रमाणपत्र न घेतलेने क्षमतेपेक्षा जादा रकमेचे देयक आदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत क्षमतेपेक्षा जादा रकमेचे देयक आदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत

एक वाहन (एम.एच.11 एम. 4512) चे नोंदणी पुस्तक पाहता त्याची क्षमता 10 मे. टन असतांना देयक 14 मे. टन प्रमाणे आदा केलेने रुपये 96,365/- जादा प्रदान झाले आहे.

4) पाणी पुरवठा करतांना टँकरची होणारी धावसंख्या ही बांधकाम विभागाकडून प्रमाणीत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच फिडींग पॉईंटवर पाणी भरलेल्या टँकरची नोंद वेळेवर नोंदवहीत ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न केलेने पुरवठा केलेल्या टँकरच्या नोंदीची पडताळणी करता आलेली नाही.

5) पंचायत समितीने फिडींग पाईंट तसेच पाणी पुरवठा केलेली गावे यांना वेळोवेळी भेटी देऊन त्याबाबतचे अभिप्राय संबंधीत लेख्यांवर नोंदविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे टंचाई कालावधीतील पाणी पुरवठयावर तसेच देयक प्रदानावर आवश्यक नियंत्रण नसलेचे दिसून येते.

**4.314 खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी केलेल्या अदायगीतील उणिवांबाबत. (शासन निधी)**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती जतने पाणीपुरवठा करणेकामी अधिग्रहित केलेल्या खाजगी टँकरवर रक्कम रुपये 70,61,324/- खर्च केलेचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी पुरवठा करण्यासाठी वापरात आणलेल्या कोणत्याही टँकरचे विहीत नमुन्यात लॉगबुक ठेवण्यात आलेले नाहीत.

2) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे टँकर क्षमता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

3) पाणी टंचाई कृती आराखडा सादर केलेला नाही. तसेच तहसिलदार यांनी प्रस्तावावर लोकसंख्येची गणना जनगणनेनुसार असल्याचे प्रमाणित केलेले नाही.

4) टँकरची आवश्यकता असलेबाबतचा शिफारस प्रस्ताव सादर केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासननिर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/ पापु-14, दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रमांक 2 अन्वये खाजगी टँकर्स वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक रोहयो/टंचाई/ आर.आर./282/14, दिनांक 05/05/2014 मधील अट क्रमांक 10 नुसार गट विकास अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांनी टँकर क्षमता प्रमाणित केलेचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

6) दैनंदिन पाणी पुरवठा दाखल्यावर गावातील 9 प्रतिष्ठीत व्यक्तींच्या सदस्यांपैकी एकाही व्यक्तीची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

7) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक रोहयो/टंचाई/आर.आर./282/14, दिनांक 05/05/2014 मधील अट क्रमांक 12 नुसार लॉगबुकवर गट विकास अधिकारी किंवा संबंधित उपअभियंता यांची स्वाक्षरी नाही.

8) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक रोहयो/टंचाई/आर.आर./282/14, दिनांक 05/05/2014 मधील अट क्रमांक 17 नुसार वाहन यांत्रिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत असल्याबाबतचे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली यांचे प्रमाणपत्र (फिटनेस सर्टीफिकेट) सादर केलेले नाही.

9) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक रोहयो/टंचाई/आर.आर./282/14, दिनांक 05/05/2014 मधील अट क्रमांक 3 नुसार पाणी पुरवठा करणा-या संबंधित ठेकेदाराने टँकरवर जी.पी.एस.प्रणाली बसविणे बंधनकारक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

10) सेवाकर अधिसुचना 2/94 एसटी दिनांक 28/06/1994 व अधिसुचना 47/2012 एसटी दिनांक 28/09/2012 अन्वये सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थाच्या देयकातून खर्च रक्कम रुपये 70,61,324/- च्या 70 टक्के म्हणजेच रक्कम रुपये 49,42,927/- च्या 12.36 टक्के दराने सेवाकर रक्कम रुपये 6,10,946/- कपात करणेत आलेली नाही.

11) आयकर शासन खाती भरणा केल्याचे कोषागार प्रमाणीत चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

12) आर.सी.टी.सी दप्तरी उपलब्ध नाही.

13) गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी लॉगबुकाची अचानक तपासणी करून खेपा व अंतर प्रत्यक्ष तपासून लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

14) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक रोहयो/टंचाई/आर.आर./282/14, दिनांक 05/05/2014 मधील अट क्रमांक 25 नुसार आदेशातील एक किंवा एकापेक्षा जास्त अटी व शर्तीचा भंग करुनही प्रति टँकर प्रति दिन रुपये 5,000/- दंड आकारण्याची कार्यवाही केलेली नाही.

**4.315 पाणी टंचाई अंतर्गत अधिग्रहीत केलेल्या विहीर / बोअर यांचेसाठी केलेल्या अदायगीतील अनियमिततेबाबत. (शासन निधी)**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती जतने विहीर / बोअर अधिग्रहणासाठी रक्कम रुपये 12,24,500/- खर्च नोंदविल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भूजल सर्व्हेक्षण विभागाकडून तपासणी / प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत.

2) अट क्रमांक 5 नुसार विहीर/बोअर मालकांनी पाणीपुरवठा करणेसाठीच्या स्वतंत्र नोंदवहीतील नोंदी अपूर्ण आहेत.

3) पाणी पिण्यासाठी योग्य असलेबाबत पाण्याचे तपासणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत.

4) वाहनाचे मुळ लॉगबुक सादर केलेले नाही.

5) प्रमाणक क्रमांक 17 व प्रमाणक क्रमांक 14 अन्वये रक्कम अदा करणेत आली आहे. मात्र आदेशावर तहसिलदार यांची स्वाक्षरी नाही.

6) सन 2014-2015 साठीचा पाणी टंचाई आराखडा / शासन आदेश लेखापरीक्षणास सादर केला नाही.

7) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/ प्र.क्रं.05/पापु-14,दिनांक 25/03/2008 मधील अट क्रमांक 2 नुसार विहीर मालकाशी कायदेशीर करार करण्यात आलेला नाही.

8) सेवाकर अधिसुचना 2/94 एसटी दिनांक 28/06/1994 व अधिसुचना 47/2012 एसटी दिनांक 28/09/2012 अन्वये सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थाच्या देयकावरील 70 टक्के रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवाकर कपात करणे आवश्यक आहे. तथापी सदर खर्च रक्कम रुपये 14,03,400/- च्या 70 टक्के म्हणजेच 9,82,380/- च्या 12.36 टक्के रक्कम रुपये 1,21,422/- सेवाकर कपात करण्यात आलेला नाही.

9) आयकर शासन खाती भरणा केल्याचे कोषागार प्रमाणीत चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.316 अखर्चित रक्कम शासनास परत करणेबाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती कागल, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी दलितवस्ती योजना अनुसूचित जाती/जमाती, बौध्द कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व शौचालय अनुदान वाटपाकरिता प्राप्त रकमेपैकी रक्कम रुपये 26,25,468/- इतके अनुदान अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खाते क्रमांक 1 हस्तांतर निधी जमा अनुदाने नमुना नंबर 13 ची पडताळणी केली असता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग क्रमांक 3 कडे महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी दलित वस्ती योजना अनुसूचीत जाती/जमाती, बौध्द कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व शौचालय अनुदानापोटी सन 2013-2014 करिता रक्कम रुपये 26,25,468/- इतके अनुदान प्राप्त झाले होते. सन 2014-2015 अखेर प्राप्त रक्कम खर्च करणे बंधनकारक असताना सदरची रक्कम खर्च केलेली नाही.

2) सदरचे अनुदान मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी खर्च करून राहणीमान सुधारणे हा शासनाचा उद्देश, अनुदान खर्च न झाल्याने सफल झाला नाही. ही बाब गंभीर असून अनुदान खर्च न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करुन अखर्चित अनुदान शासनास तात्काळ परत करणे आवश्यक आहे.

**4.317 मौजे वांगरवाडी येथे पाणी पुरवठा योजना करणे.**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** मौजे वांगरवाडी येथे पा पू योजना  करणे याकामासाठी रक्कम रुपये 2,41,317/- इतका खर्च झालेला आहे.

1) लेखापरीक्षणास कामाचे मोजमाप नोंदवही क्रमांक 2258 तपासणीस सादर केले नाही. त्यामुळे रक्कम रुपये 2,41,317/- एवढी रक्कम मोजमापानुसार मक्तेदारास अदा केलेबाबतची खात्री केलेली नाही.

2) कामात वापरण्यात आलेल्या साहित्यांचे चाचणी तपासणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत.

3) सदर कामांत 60 मीटर बोअर मारण्यात आलेले आहे. शोषनलिकेसाठी 135मीटर सीपीव्हीसी पाईप वापरण्यात आले आहे. 60 मीटर बोअर असतांना 135 मीटर पाईप कोणत्या आधारांवर वापरण्यात आले याचा खुलासा करावा. जादा वापरण्यात आलेलया 75 मीटर सीपीव्हीसी पाईप चे  किंमत रुपये 43,200/- (दर रुपये 320/- प्रती मी) वसूल करणे आवश्यक आहे.

4) सदर कामांत 60 मीटर बोअर मारण्यात आलेले आहे. बोअर मोटरसाठी 160 मीटर प्लॅट प्लेझिंबल केबल  वापरण्यात आले आहे. 60 मीटर बोअर असतांना 160 मीटर केबल  कोणत्या आधारांवर वापरण्यात आले याचा खुलासा करावा. 60 मी बोअर साठी सर्वसाधारण 70 मी केबल वापरणे अपेक्षित आहे. जादा वापरण्यात आलेलया 90 मीटर केबल चे किंमत रुपये 13,590/- (दर रुपये 151/- प्रती मी) वसूल करणे आवश्यक आहे**.**

**4.318 पाणी टंचाई निवारणार्थ टँकरने पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती अक्कलकोट यांचेकडील सन 2014-2015 चे लेखापरीक्षण कालावधीत नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ पाणी टंचाई काळात टँकरने पाणीपुरवठा करणेकामी पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती अक्कलकोट यांनी खालील नमुद केलेनुसार रक्कम रुपये 13,23,635/- एवढा खर्च केलेला आहे.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा करणे योजनेवरील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) पाणी पुरवठा टंचाई कालावधीमध्ये तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावामध्ये पाणी पुरवठा करणेकामी करारातील अटी व शर्तीनुसार क्षमता 12000 लीटर असलेबाबत वजनमापे विभागाकडील संबंधीत सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत करुन तसा दाखला देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे देयकातील नमुद टँकरची क्षमता 12000 लीटर एवढीच असलेबाबतची खात्री करता आलेली नाही. त्यामुळे जादा रक्कम अदा केलेबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 20 नुसार प्रत्येक टँकरची क्षमता संबंधीत सक्षम प्राधिकारी तहसीलदार यांचेमार्फत रिकाम्या व भरलेल्या टँकरने वजन करुन निश्चित केलेबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत नाही. तसेच निरीक्षक, वैद्यमापक शास्त्र, सोलापूर यांचेकडून क्षमता ठरवून घेतलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे टँकर 12000 लीटर क्षमतेचे असलेबाबतची खात्री करता आलेली नाही.

3) तसेच सन 2014-2015 मध्ये वरिल नमुद केले नुसार नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षांतर्गत एकुण प्राप्त अनुदानापैकी रक्कम रुपये 3,06,807/- एवढी रक्कम अखर्चित असल्याचे आढळून आले आहे. सदरची रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी दाखवावी. अन्यथा सदरची अखर्चित रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

4) पंचायतीने खालील नमूद केलेप्रमाणे ठेकेदाराच्या देयकातून डिझेलपोटी दिलेल्या रकमांचे समायोजन करुन उर्वरीत रक्कम ठेकेदारास अदा केलेली आहे. परंतु यापूर्वी  ठेकेदारास टँकरने पाणीपुरवठा करणेकरीता डिझेलसाठी आगाऊ रकमा आदा केल्या किंवा कसे ? हे अग्रीम नोंदवही ठेवून ताळमेळ घेतला नसल्याने समजून येत नाही. तरी यापूर्वी ठेकेदारास डिझेलसाठी आदा केलेल्या रकमांचा ताळमेळ घेवून व नोंदी सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणित करुन पुर्तता दाखविणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने जिल्हाधिकारी यांचेसोबत केलेल्या कारनाम्यात डिझेलसाठी आगाऊ रकमा देणेबाबत नमुद केले नसताना डिझेलसाठी सन 2014-2015 मध्ये रक्कम रुपये 43,772/- एवढा अग्रिम ठेकेदारास अदा केलेला आहे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) पंचायतीने संबंधित ठेकेदाराचे देयकातून 2 टक्के दराने आयकराची कपात करणे आवश्यक असताना तशी आयकराची कपात करण्यात आलेली नाही. तरी ठेकेदारास अदा केलेली रक्कम रुपये 13,23,635/- रक्कमेवर 2 टक्के दराने रुपये 26,473/- इतकी आयकर रकमेची वसुली करुन चलनाने शासननिधीत भरणा केलेची पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**4.319 पाणी टंचाई निवारणार्थ टँकरने पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती मंगळवेढ़ा यांचेकडील सन 2014-2015 चे लेखापरीक्षण कालावधीत नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ पाणी टंचाई काळात टँकरने पाणीपुरवठा करणेकामी रक्कम रुपये 3,62,00,000/- खर्च केलेला आहे.

1) पाणी पुरवठा टंचाई कालावधीमध्ये तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावामध्ये पाणी पुरवठा करणेकामी करारातील अटी व शर्तीनुसार क्षमता 12000 लीटर असलेबाबत वजनमापे विभागाकडील संबंधीत सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत करुन तसा दाखला देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे देयकातील नमुद टँकरची क्षमता 12000 लीटर एवढीच असलेबाबतची खात्री करता आलेली नाही. त्यामुळे जादा रक्कम अदा केलेबाबतची शक्येता नाकारता येत नाही.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 20 नुसार प्रत्येक टँकरची क्षमता संबंधीत सक्षम प्राधिकारी तहसीलदार यांचेमार्फत रिकाम्या व भरलेल्या टँकरचे वजन करुन निश्चित केलेबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत नाही. तसेच निरीक्षक, वैद्यमापक शास्त्र, सोलापूर यांचेकडून क्षमता ठरवून घेतलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे टँकर 12000 लीटर क्षमतेचे असलेबाबतची खात्री करता आलेली नाही.

3) तसेच सन 2014-2015 मध्ये वरिल नमुद केले नुसार नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षांतर्गत एकुण प्राप्त अनुदान रक्कम रुपये 3,66,80,000/- पैकी रक्कम रुपये 3,62,00,000/- एवढी रक्कम खर्च केलेली असून उर्वरीत शिल्लक रक्कम रुपये 4,80,000/- इतकी पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी दाखवावी. अन्यथा सदरची अखर्चित रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

4) प्रमाणक क्रमांक 32 दिनांक 2/08/2014 अन्वये रक्कम रुपये 60,00,000/- संबंधित ठेकेदार यांस टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी अग्रीम अदा केलेला आहे व् सदरची अग्रीम रक्कम प्रमाणक क्रमांक 10,दिनांक 09/10/2014 रोजी अदा केलेल्या देयाकतुन रक्कम रुपये 60,00,000/- एवढ्या रक्कमेचे समायोजन केलेले आहे. परंतु ठेकेदाराने जिल्हाधिकारी यांचेसोबत केलेल्या कारनाम्यात अग्रीम रक्कम देणेबाबत नमुद केले नसताना अग्रीम रक्कम काय आधारे ठेकेदारास आदा करनेत आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वी ठेकेदारास टँकरने पाणीपुरवठा करणेकरीता अग्रीम रक्कम आदा केल्या किंवा कसे ? हे अग्रीम नोंदवही ठेवून ताळमेळ घेतला नसल्यारने समजून येत नाही. तरी मागील अग्रीम रक्कम व चालू वर्षात ठेकेदाराला देण्यात आलेली अग्रीम रक्कम यांचा ताळमेळ घेवून व नोंदी सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणित केलेल्या नाहीत.

5) उपरोक्त नमूद केलेनुसार टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी सन 2014-2015 मध्ये ठेकेदारास एकूण रक्कम रुपये 3,62,00,000/- अदा करण्यात आलेली असून सदरचे देयाकातुन 2 टक्के दराने रक्कम रुपये 8,12,147/- एवढी अयाकराची रक्कम कपात करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम योग्य त्या लेखाशीर्षाखाली चलनाने शासननिधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**4.320 टँकरने पाणी पुरवठा करणे योजनेतील उणिवा.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती सांगोला यांचे सन 2014-2015 चे लेखापरिक्षण कालावधीत वाड्या वस्त्यांना टँकरने पाणी पूरवठा करणेसाठी रक्कम रुपये 40,00,000/- खर्च करण्यात आलेला आहे.

1) सांगोला तालूक्यामध्ये विविध ठीकाणी विविध पाणी पुरवठा करण्यात आलेला असून त्यांचे क्षमता चाचणी प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध नाही.

2) मौजे अजनाळे तालुका सांगोला येथे करण्यात आलेल्या पाणी पूरवठ्याचे अंतर 240 किमी. दर्शविले आहे. व त्याप्रमाणे देयक अदा करण्यात आलेले आहे. तथापि सदरचे अंतर कोणत्याही अधिकृत शासकीय यंत्रणेने प्रमाणित केलेले नाही. तसेच अन्य ठिकाणी केलेल्या पाणी पूरवठयाचे अंतर प्रमाणित केलेले नाही.

3) जिल्हाधिकारी यांनी केलेल्या करारनाम्यानूसार ठेकेदाराने टँकरमधे जीपीएस यंत्रणा कार्यरत करावयाची असून जीपीआरएस रिपोर्ट नुसारच देयके अदा करणेबाबत सुचना देण्यता आलेल्या आहेत. तशी कार्यवाही केलेली नाही.

4) ठेकेदाराबरोबर केलेल्या कराराप्रमाणे कोणत्याही कारणांसाठी अग्रिम देण्यात येणार नाही असे स्पष्ट केले असताना सुध्दा, प्रमाणक क्रमांक 6,दिनांक 02/09/2014 अन्वये बबनरावजी शिंदे सहकारी मोटार वाहतूक संस्था मर्यादित यांना पाणी पूरवठा करण्यासाठी खाजगी टँकर्सच्या इंधनासाठी व चालकांच्या वेतनासाठी अग्रिमधन आदेश क्रमांक-ग्रापापू/पाटं/309/14/ सांगोला दिनांक 02/09/2014 अन्वये मंजूर करून रूपये 40,00,000/- अदा करण्यात आलेले आहेत.

**4.321 टंचाईग्रस्त गांवाना कमी पाणीपुरवठा केलेल्या खेपांच्या दंडवसूलीबाबत.**

**पंचायत समिती माळशिरस, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** श्री.बबनरावजी शिंदे सहकारी मोटर वाहतूक सहकारी संस्था ता. माढा यांनी सन 2013-2014 मध्ये तालुक्यातील टंचाईग्रस्त गांवाना टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पिण्याच्या पाण्याचे देयक दिनांक 03/03/2015 रोजी सादर केले आहे. तपशिलानुसार मंजूर खेपा 599 असून टाकलेल्या खेपा 536 आहेत व कमी खेपा 63 आहेत. सदर वाहतूक संस्थेने जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याशी केलेल्या करारातील अट क्रमांक 15 अ नुसार प्रति कमी खेप रुपये 2,000/- प्रमाणे दंड आकारणेबाबत सुस्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि संबंधित संस्थेकडून 63 कमी खेपांपोटी दंडांची रक्कम रुपये 1,26,000/- वसूल केलेली नाही.

**4.322 ग्रामीण पाणीपुरवठा विभागा कडील टँकर वरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कुर्दूवाडी, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** सोलापूर जिल्हा तालुका करमाळा पाणीटंचाई काळामध्ये टंचाई असलेल्या गावांना ठेकेदारामार्फत् टँकरने पाणीपुरवठा करणेकरीता करारनामा करण्यांत आला होता. त्यानुसार ठेकेदाराने अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक होते. सन 2014-2015 मध्ये टँकर वर रक्कम रुपये 1,29,04,965/- इतका खर्च नोंदवण्यात आलेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे उणिंवा दिसून आल्या.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 3099/प्र.क्र. 14, दिनांक 01/02/1999 अन्वये टँकर मंजूरीचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना असून सदर विभागाचे आदेशान्वये टँकर नियुक्त होणे आवश्यक आहे.व सदर आदेश परिपूर्ण असणे आवश्यक आहे. नियुक्तीचे आदेश पाहता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे आदेश क्रमांक रोहयो/पाणीटंचाई/टॅ.मं./प्र.क्र.07/ 2014, दिनांक 13/04/2014 या आदेशामध्ये टँकर क्रमांक नमूद नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/ प्र.क्र.53/पापु14,दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रमांक 2 अन्वये खाजगी टँकर्स/ट्रक वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी श्री.बबनरावजी शिंदे मोटार वाहतूक संघ, तालुका माढा, जिल्हा सोलापूर यांची टँकर / वाहने अधिग्रहीत केली असून त्यांचे वाहनाचे पाणी वाहन क्षमता उपविभागीय अभियंता (वर्ग 1) ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग करमाळा/कुर्ड़ूवाडी यांना टँकरचे क्षमता प्रमाणपत्र दिले आहे. याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र नसतांना वाहन क्षमता वरील मे. टन गृहीत धरुन रक्कम अदा केली.

3) प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 1 अन्वये गांव वाडी पासून 1.5 की.मी.च्या परिसरांत पिण्याच्या पाण्याचा उदभव नाही याची तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी खात्री करावी असे आहे. त्याप्रमाणे खात्री केल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणांस उपलब्ध झाली नाहीत.तसेच त्याबाबतचा करारनामा उपलब्ध नाही.

4) जिल्हाधिकारी यांचे अधिग्रहण आदेशांचे अवलोकन केले असतां आदेश क्रमांक रोहयो/ पाणीटंचाई/टॅ.मं/प्र.क्र.07/14,दिनांक 13/04/2014 अन्वये सोलंकरवाडी येथे टॅंकर अधिग्रहण व टॅंकरदारे पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशामध्ये अधिग्रहण करण्यासाठी दिनांक 15/04/2014 नमूद आहे. परंतु प्रत्यक्ष दिनांक 13/04/2014 व दिनांक 14/04/2014 या दोन दिवशी सदर वाहनाने 4 खेपा पाणीपुरवठा केला आहे. व त्यावर अनुक्रमे रुपये 2,741/- व 2,578.46 एवढा खर्च करण्यांत आलेला आहे.

5) आदेश क्रमांक रोहयो/पाणीटंचाई/टॅ.मं./प्र.क्र.05/2014,दिनांक 23/04/2014 अन्वये पडसाळी येथे टॅंकर अधिग्रहण व टॅंकरने पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशान्वये अधिग्रहीत करण्यासाठी दिनांक 26/04/2015 नमूद आहे. परंतु प्रत्यक्ष दिनांक 23/04/2014 रुपये 2,551.58, दिनांक 24/04/2013 रुपये 2,574.77 व दिनांक 25/04/2014 रुपये 2,026.08 या तीन दिवसांत सदर वाहनाने 5 खेपा पाणीपुरवठा केला आहे. वरील नमूद प्रमाणे संबंधीतांस प्रमाणक क्रमांक 362,दिनांक 18/02/2014 रुपये 89,04,965/- प्रदान झाले आहे.

6) प्रमाणक क्रमांक 188, दिनांक 05/09/2014 रुपये 40,00,000/- सदर प्रमाणकाचे अवलोकन केले असतां श्री.बबनरावजी शिंदे सहकारी मोटार वाहतूक संस्था,मर्या,माढा या संस्थेस त्यांचे पत्र दिनांक 27/08/2014 अन्वये केलेल्या मागणीवरुन व उपविभागीय अभियंता वर्ग-1, ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद उपविभाग करमाळा/कुर्डूवाडी यांचे शिफारसपत्र क्रमांक ग्रापापु उवि/टंचाई/167/2014,दिनांक 01/09/2014 अन्वये 40 लाख चे अग्रीम मंजूर करुन प्रदान केले आहे. सदरचे प्रदान हे नियमबाहय आहे.

**4.323 ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कडील वाहन भाडे करार तत्वावर घेणेबाबत.**

**पंचायत समिती मंगरुळपीर, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2014-15 मध्ये पंचायत समिती मंगरुळपीर, यांनी ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कडील वाहन भाडे करार तत्वावर घेवून त्यावर रुपये 2,03,799/- खर्च करण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त् विभाग शासन निर्णय क्रमांक वाहन 1000/प्र.क्र.65/2001/ विनिमय/ दिनांक 10/09/2001 नुसार वाहन भाडयाने घेतांना वाहन वापर संबंधी धोरणाचा अवलंब केला नाही.

2) वाहतुकीचे दर निश्चित करण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्याकडून वाहतुकीचे नविन दर सन 2014-15 मध्ये मागविण्यात आले नाहीत. दर निश्चिती कशाचे आधारे करण्यात आली.

3) दिनांक 04/02/2014 ला करारनामा करुन देण्यात आला व कामाचा आदेश दिनांक 14/07/2014 देण्यात आला कामाचे आदेशापुर्वीच करारनामा कसा करण्यात आला.

4) ग्रामीण पाणी पुरवठा पत्र क्रमांक 966 दिनांक 31/07/2014 नुसार कामाचा आदेश 2000 कि.मी पर्यंत रुपये 28,700/- व त्यापुढील धावसंख्या प्रती कि.मी. रुपये 9/- दराने सौ.अलका बोराडे यांचे नावे देण्यात आला. परंतु निविदा व करारनाम्याप्रमाणे 1500 कि.मी. धावकरीता रुपये 21,000/- रुपये व त्यापेक्षा जास्त् धाव रुपये 7/- प्रति कि.मी. दराने मंजुरी देण्यात आली असतांना नियमबाहयपणे जादा दराने कामाचा आदेश देण्यात आला. करीता रुपये 26,620/- जादा प्रदान केले वसुल करण्यात यावे.

5) निविदा सुचना प्रसिध्द पत्रकातील अट व शर्तीनुसार वाहन 5 वर्षापेक्षा जुने नसावे नमुद आहे. वाहनाची खरेदी दिनांक 04/12/2009 आहे. नियमबाहयपणे 5 वर्षावरील करारनामा रदद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) उपरोक्त प्रमाणे दिनांक 01/12/2014 ते 28/02/2015 पर्यंत झालेली धावसंख्या 7751 कि.मी. व 2000 कि.मी. करीता रुपये 28,700/- व पुढील रुपये 9/- कि.मी. प्रमाणे रुपये 1,01,859/- रक्कम नियमाबाहय ठरत सदर रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा करण्यात यावी.

7) सन 2013-14 व सन 2014-15 मध्ये निविदा बोलावण्यात आल्या परंतु ठराविक त्याच व्यक्तीच्या निविदा पुनश्च स्विकारण्यात आल्या त्यामुळे योग्य दराचा फायदा झाला नाही. वाहनाचे वापराचे वैध कालावधी संपला असतांना देखील त्याच व्यक्ती वाहन भाडे तत्वावर नियमाबाहयपणे घेण्यात आले.

8) निविदा सुचनेतील अट क्रमांक 4 नुसार बयाणा रक्कम रुपये 2000/- चे राष्ट्रीयकृत बँकेचे एफडीआर पावती नस्तीस उपलब्ध झाली नाही.

9) निविदा सुचना प्रसिध्दी क्रमांक 2 नुसार कोरे निविदा प्रपत्र विक्री किंमत रुपये 100/- ची तपासणीस उपलब्ध झाली नाही.

10) निविदा प्रसिध्दी अट क्रमांक 6 नुसार करारनामा कालावधीतील वाहन मालकाचे एकुण आसन क्षमता मंजूर व्यक्ती व ड्रायव्हर यांचे सुरक्षा विमा करण्यात आले नाही.

**4.324 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत पाणी टंचाई वर केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती दिग्रस, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात नैसर्गिक अंतर्गत पाणी टंचाई वर रक्कम रुपये 4,70,600/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोख क्रमांक 2 पेळू या गावात ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कायम स्वरुपी नळ योजना घेण्यात आली असतांना त्या गावाला टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्याबाबत विहीर अधिग्रहण मालकाला मोबदला प्रदान केल्याचे निर्दशनास येते. यावरुन पाणी पुरवठा योजना अंतर्गत कायम स्वरुपी योजनेवर केलेला खर्च निरर्थक झाल्याचे स्पष्ट होते.

2) विहीर अधिग्रहण करण्यापुर्वी विहीर असल्याबाबत 7/12 घेणे आवश्यक होते तो घेण्यात आलेला नाही.

3) विहीर अधिग्रहण करण्यापूर्वी संबधिताच्या शेतात विहीर व इतर पुरक साहीत्य / मोटरपंप आहे किंवा नाही याबाबत प्रत्यक्ष भेट दिल्याबाबत प्रमाणपत्रावर गटविकास अधिकारी यांनी दिनांक नमुद केली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष भेट न देता कागदोपत्री भेट दाखविल्याचे स्पष्ट होते.

4) तहसिलदार / गटविकास अधिकारी यांनी टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्याकरीता वेळापत्रक तयार करुन घेणे आवश्यक असतांना वेळापत्रक तयार करुन देण्यात आला नाही.

**4.325 ग्रामीण पाणी पुरवठा दुरुस्ती अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील नळ योजनेचे मोटरपंप खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती घाटंजी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** ग्रामपंचायत स्तरावर नळयोजनेचे मोटरपंप दुरुस्ती व डिझेल खरेदी वर मार्च 2015 पर्यंत रक्कम रुपये 9,85,482/- एवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोटरपंप दुरुस्तीबाबतची मोजमाप पुस्तिका क्रमांक 2 सादर केली नाही.

2) मोटरपंप नादुरुस्ती असल्याबाबत तपासणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

3) कंत्राटदार पांडे इलेक्ट्रीकल्स व इन्फ्राटेक, यवतमाळ यांची करारनामा नस्ती सादर केली नाही.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रुपये 19,709/- वसुल करुन आयकर खाती जमा करावी.

5) दिनांक 30/09/2014 पर्यत ची मुदतवाढ पत्रासोबत कंत्राटदाराची यादी जोडली नाही.

6) पांडे इलेक्ट्रीकल्स इन्फ्रा यांनी सर्व ग्रामपंचायत स्तरावरील मोटरपंप दिनांक 04/03/2015 रोजी दुरुस्त केले असतांना ग्रामपंचायत सरपंच / सचिव यांनी सादर केलेल्या मोटरपंप चालु असल्याचे प्रमाणपत्रात नमुद दिनांक मध्ये तफावत आढळून आली.

**4.326 पंचायत समिती सेस फंड अंतर्गत ब्लीचींग पावडर खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती नांदुरा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, नांदुरा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतेवेळी लेखापरीक्षण कालावधीत ब्लिचींग खरेदी देयकाची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामिण पाणी पुरवठा, उपविभाग, नांदुरा यांनी यश केमिकल्स, धुळे यांचेकडुन प्रमाणक क्रमांक 96, दिनांक 09/01/2015 नुसार ब्लिचींग पावडर बॅग खरेदी 25 किलो प्रति बॅग 495/- रुपये दराने खरेदी केली आहे. पंचायत समिती, नांदुरा अंतर्गत आरोग्य विभाग यांनी प्रति बॅग रुपये 749/- दराने खरेदी केली आहे. (495-749)=254/- रुपये प्रति बॅग् जादा दराने ब्लिचींग पावडर बॅग आरोग्य विभागाकडुन खरेदी करण्यात आली. एकाच पंचायत समितीत दोन विभागात वेगवेगळया दराने खरेदी केली आहे त्यामुळे ( 40 बॅग जादा दर x 254= 10160/-) 10,160/- रक्कमेचे जादा प्रदान झाले आहे.

**4.327 नैसर्गिक आपत्ती पाणी टंचाई निवारणार्थ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मोताळा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** नैसर्गिक आपत्ती खर्च प्रमाणके पडताळणी केली असता पाणी टंचाई निवारणार्थ टँकर देयके पारीत करुन संबंधित ठेकेदारास प्रदाने केल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देयकांमधून आयकर कपात (2%) केल्याचे आढळते. परंतु त्या रकमा शासनखाती भरणा केल्या बाबतच्या चलान नस्ती सोबत आढळल्या नाहीत.

अ) टँकर क्रमांक एम एच- 04 C 5313 (प्रमाणक क्रमांक, 348,29-9-2015) रुपये 2,93,679/-

ब) टँकर क्रमांक एम एम 17 K 5611 ( प्रमाणक क्रमांक, 349,29-09-2015) रुपये 5,81,283/-

क) टँकर क्रमांक MTS-9640 (प्रमाणक क्रमांक 353, दि. 29-89-2014) रुपये 3,50,848/-

ड) टँकर क्रमांक MH-04-B4-4500 (प्रमाणक क्रमांक 354, 29-9-2014) रुपये 5,04,677/-

2) मुळ लॉग बुक उपलब्ध नसल्याने डिझेल नोंदी वापराची आवश्यक तपासणी करता आली नाही.

**4.328 खाजगी टँकरने केलेल्या पाणीपुरवठा अदायगी मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती वैजापूर, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती वैजापुर यांनी खाजगी टँकरने केलेल्या पाणीपुरवठयाच्या भाडे पोटी रूपये 10,75,050/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी पुरवठा टँकर प्रत्यक्ष वेळच्या वेळी गावात पोहचला व त्याने नियोजित खेपा पुर्ण केल्याचे वेळी त्या गावातील पाणी पुरवठा स्वच्छता समितीने निवड केलेल्या दोन महिला सदस्याची व ग्रामसेवकाची लॉगबुकावर स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत.

2) टँकरची क्षमता तहसिलदार/गटविकास अधिकारी किंवा प्रादेशिक परीवहन सक्षम अधिकारी यांनी टँकर क्षमतेचे प्रमाणपत्र दिल्याचे दर्शिविले नाही.

3) टँकर सोबत टी.सी.एल. साठा संबंधित सक्षम अधिका-याकडुन प्राप्त करुन पाणी शुध्द करुन घेतल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

4) गावाची लोकसंख्या नुसार किती टँकर लावणे आवश्यक होते. तसेच सक्षम प्राधिका-यांने अंतर प्रमाणीत केल्याचे दर्शविले नाही.

5) गावामध्ये वारंवार पाणी टंचाई निर्माण होवुन मोठया प्रमाणावर या कामी खर्च होत असल्याने ठोस पाऊले या योजनेकरिता उचलल्याचे संचिकेत दिसुन येत नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 50 नुसार संबंधीतास रक्कम प्रदान केल्यावर पावती घेणे आवश्यक आहे. पावत्या दर्शविल्या नाही.

**4.329 खाजगी विहीर अधिग्रहनावरील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 49) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन वियोजन विभाग निर्णय रोजगार हमी योजना क्रमांक 2551/प्र.क्र.-28/रोहयो-6, दिनांक 24/12/1991 नुसार शासकिय अनुदानित विहीरी प्रथम अनुग्रहीत केल्या नाहीत.

2) महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहीरीचे अधिग्रहन न केल्याचे माहिती सादर केलेली नाही.

3) शासन निर्णय क्र.टंचाई /1099/प्र.क्र.-2/पापु-14/दि.03/02/1999 व शासन निर्णय क्रमांक टंचाई/008/प्र.क्र.89/पापु-14, दि.27/08/2008 अन्वये तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी एकत्रित पाहणी करुन टंचाई ग्रस्त गावांचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठवुन गाव टंचाई ग्रस्त जाहिर झाल्याचे दर्शविले नाही.

4) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पा.पु.14, दिनांक 30/04/2014 अन्वये विहीर मालकाने साधन सामुग्री उपलब्ध करुन दिल्यास 400 रुपये व साधन सामुग्री नसल्यास 300 प्रमाणे मोबदला देण्यात यावा याबाबत करार केल्याचे दर्शविले नाही.

5) प्रमाणक क्रमांक 15 माहे 12/2014 व प्रमाणक क्रमांक 34 माहे 12/2014 अन्वये श्री.सुरेश रामचंद्र रत्नपारखी रा.निल्लोड, तालुका सिल्लोड दिनांक 01/02/2013 ते 20/07/2013 या कालावधीसाठी विहिर अधिग्रहणासाठी रु.68,000/- चे प्रदान केलेले आहे. देयकासोबत जोडलेल्या तहसिलदार यांचे आदेशानुसार श्री.रत्नपारखी यांची संपादित क्षेत्रातील विहिर अधिग्रहित केलेली आहे. त्यामुळे प्रतिदिन रु.400/- प्रमाणे 170 दिवसाचे रुपये 68,000/- रुपये संबंधितांना दिलेले आहे. तहसिलदार सिल्लोड यांचे आदेश जावक क्रमांक अन्वये फेब्रुवारी, 2013 मध्ये दिनांक 20/02/2013 ते 31/03/2013 पर्यंत व आदेश क्रमांक 153 दिनांक 05/02/2014 मध्ये दिनांक 01/04/2013 ते 30/06/2013 पर्यंतच निर्गमित केलेले आहे. उर्वरीत दिनांक 01/07/2013 ते 20/07/2013 एकूण 20 दिवसाचे आदेश देयकात व संचिकेत दिसून आलेले नाहीत. जादा दिलेली एकुण 20 दिवसाचे रुपये 400/- प्रमाणे रुपये 8000/- श्री. रत्नपारखी यांच्याकडुन वसुल करण्यात यावी.

6) प्रमाणक क्रमांक 33 माहे 12/2014 अन्वये रूपये 22,400/- ची रक्कम दोन वेळेस प्रदान केलेली आहे.

7) पुरविण्यात येणारे पाणी हे पिण्यायोग्य आहे या बाबत प्रयोगशाळेमार्फत तपासणी केलेली नाही. नियमित ब्लिचींग पावडर टाकल्याचे दिसुन आले नाही. स्थळ पाहणी अहवाल, पाणी उपलब्धतेचा गोषवारा, विहीर अंतराचे प्रमाणकाचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे लेखे संचिकेत नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 21 मध्ये प्रदानाची पोंच घेण्यात आलेली नाही.

**4.330 नैसर्गिक आपत्ती पाणीपुरवठा खाजगी टँकरवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सोयगाव, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती सोयगाव यांनी खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्याकरिता खाजगी टँकरवरील भाडयापोटी रूपये 3,37,964/- चा खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी उचलले बाबतच्या मंजुरी आदेश नोंदी मालकाच्या नावाची, गटक्रामांची नोंद घेण्यात आलेली नाही. फर्दापुर गावास पाणी पुरवठा करणा-या टँकरची क्षमता 12000 लिटरची असल्याची व त्यास आर.टि.ओ.ची मान्यता असल्याचे आर.सी.बुक दर्शविले नाही.

2) लॉगबुकामध्ये प्रत्येक खेपेची वेळ व खेपांची स्वतंत्र नोंद, आणि स्वच्छता समितीच्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना घेतलेली नाही.

3) फर्दापुर गावास दिनांक 16/01/2013 ते 25/01/2013 या कालावधीत केलेल्या पाणीपुरवठा टँकरचे भाडे रुपये 13,626/- च्या अदायी देयकासोबतच्या लॉगबुकाच्या झेरॉक्स प्रतीसोबत गटविकास अधिकारी/सरपंच यांचे प्रमाणपत्र नसुन कालबाहय देयकास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही.

4) मुर्ती गावास केलेल्या दिनांक 29/04/2013 ते 31/04/2013 दोन दिवस 1,500/- प्रमाणे भाडे व दिनांक 01/05/2013 ते 18/06/2013 पर्यंत रूपये 1,800/- प्रमाणे भाडे व 18.50 पैसे किलोमिटर प्रमाणे 392 किलोमीटरचे रूपये 23.60 किलोमीटर प्रमाणे रूपये 9,604/- असे एकुण 3,24,146/- रुपये प्रदान केलेल्या देयका सोबतच्या लॉगबुकाच्या झेरॉक्स प्रतीवर पाणीपुरवठा केल्याबाबत सरपंच /ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र नाही. तसेच देयक कालबाहय प्रदान करण्यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरी घेतलेली नाही.

**4.331 अधिग्रहण विहीर मालकास जादा रक्कम प्रदान करणेबाबत. (राज्य क्षेत्र निधी).**

**पंचायत समिती भोकरदन, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील पंचायत समिती भोकरदन येथील लेखापरीक्षण करीत असंतांना शेतकऱ्यांच्या विहीर अधिग्रहण केलेल्या विहीरीचे प्रति दिवस 100/- फरक दिलेला आहे. सदर फरक हा 30/04/2012 पासुन देय असतांना विहीर मालकास 01/04/2012 पासुन फरक दिल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/ प्र.क्र.53/पा.पु.14 मंत्रालय मुंबई,दिनांक 30/04/2012 अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक 91/0804213,दिनांक 14/03/2008 महसुल व वनविभाग नुसार पाणी पुरवठ्याचे अधिग्रहण केलेल्या विहीरीच्या मोबदल्यात विहीर अधिग्रहण मालकास वाढ म्हणुन प्रति 100/- प्रमाणे दिनांक 30/04/2012 पासुन देय असतांना प्रमाणकान्वये विहीर धारकास 01/04/2012 पासुन फरक दिल्यामुळे 74 विहीर मालक प्रति विहीर मालक जादा दिवस 29 एकुण 2146 दिवस म्हणेजेच 2146 दिवस x 100 प्रति दिवस प्रमाणे रूपये 2,14,600/- संबंधितांकडुन वसुल करण्यात यावे.

**4.332 खाजगी विहीर मालकास फरक जादा प्रदान करणेबाबत. (राज्य क्षेत्र निधी)**

**पंचायत समिती भोकरदन, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील पंचायत समिती भोकरदन येथील लेखापरीक्षण करीत असंतांना शेतकऱ्यांच्या विहीर अधिग्रहण केलेल्या विहीरीचे प्रति दिवस रूपये 100/- फरक दिलेला आहे. सदर फरक हा 30 एप्रिल 2012 पासुन देय असतांना विहीर मालकास 1 एप्रिल 2012 पासुन फरक दिल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पा.पु.14 मंत्रालय मुंबई, दिनांक 30/04/2012 अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक 91/0804213,दिनांक 14/03/2008 महसुल व वनविभाग नुसार पाणी पुरवठ्याचे अधिग्रहण केलेल्या विहीरीच्या मोबदल्यात विहीर अधिग्रहण मालकास वाढ म्हणुन प्रति 100/- प्रमाणे दिनांक 30/04/2012 पासुन देय असतांना प्रमाणकान्वये विहीर धारकास 01/04/2012 पासुन फरक दिल्यामुळे 22 विहीर मालक प्रति विहीर मालक जादा दिवस 29 एकुण 638 दिवस म्हणेजेच 638 दिवस x 100 प्रति दिवस प्रमाणे रूपये 63,800/- वसुल करण्यात यावे.

**4.333 खाजगी विहीर अधिग्रहणातील अनियमिततेबाबत. (राज्य क्षेत्र निधी)**

**पंचायत समिती जाफ्राबाद, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती जाफ्राबाद यांनी 2014-2015 या कालावधीत खाजगी विहीर अधिग्रहण बाबीवर एकुण रुपये 7,46,100/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पा.पु.14,दिनांक 03/02/1999 अन्वये तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावाची प्रत्यक्ष पाहणी करुन तसा स्थळ पाहणी अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 च्या कलम 4 अन्वये टंचाईग्रस्त गाव जाहीर केल्याबाबत तसेच सतत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीत एकाच विहरीचे अधिग्रहण झाले तर उपजिल्हधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहरीची पाहणी केल्याबाबत अभिलेखे नसल्याने खात्री करता आली नाही.

2) स्थळ पाहणी अहवाल हे प्रत्यक्ष पाणी पुरवठा केल्यानंतरचे आहेत. त्यात उदगम ते पाणी पुरवठ्याचे अंतर नमुद केले नसल्याचे आढळुन आले.

3) गतवर्षीचे लाभ (सन 2013-14) या वर्षी देण्यासाठी पंचायत समितीची सर्वसाधारण सभेद्वारे मान्यता घेणे आवश्यक होते. तसेच या वर्षी तेवढा निधी जिल्हाधिकारी यांचेकडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. त्याबाबत प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

4) गाव ते विहीर पर्यंतचे अंतर सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केले नाही. विहीर अधिग्रहण करण्यापुर्वी संयुक्त स्थळ पाहणी केली नाही. प्रत्यक्ष पाणीपुरवठा केल्यानंतर स्थळपाहणी केली व विहरीला पुरेसे पाणी असले बाबत व पिण्यायोग्य असलेबाबत शासकीय प्रयोग शाळेतुन तपासणी करण्यात आली नाही.

**4.334 खाजगी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमितता**

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती गेवराई यांनी 2245- नैसर्गिक आपत्ती योजनेतुन गेवराई तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी प्रमाणक क्रमांक 18 माहे 02/2015 अन्वये रुपये 45,35,690/- खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टँकरव्दारे पाणीपुरवठा केल्याबाबतची देयके महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 मधील तरतुदीनुसार नमुना नंबर 29 मध्ये पारीत केलेली आहेत. नियमातील तरतुदीनुसार कंत्राटदाराच्या मागणी देयकासोबत संबंधिताने पाणीपुरवठा केलेल्या टँकरच्या लॉगबुकच्या प्रती संलग्न केलेल्या नाहीत.

2) जिल्हाधिकारी बीड / तहसीलदार गेवराई आदेशीत केल्याप्रमाणे मंजुर क्षमतेच्या टँकर ऐवजी जास्त क्षमतेच्या टँकरने अर्धमसला, तलवाडा आणि चकलांबा येथे पाणीपुरवठा केल्यामुळे अतिरिक्त पाणी टाकल्याने एकुण रुपये 3, 41,475/- चे अतिप्रदान झालेले आहे.

3) धुमेगांव येथील पाणीपुरवठा करतांना उपअभियंता गेवराई यांनी प्रमाणित केलेल्या अंतरापेक्षा जादा अंतर दर्शविल्यामुळे टँकर क्रमांक एमएच-23/557 व एमएच-17/7087 साठी अनुक्रमे रुपये 17,427/- व रुपये 23,436/- चे जादा प्रदान झालेले आहे.

4) सैदापुर येथे मंजुर खेपापेक्षा जादा खेपा केल्याने रुपये 3,285/- चे जादा प्रदान झालेले आहे.

5) मौजे इटकुर / शिंपेगांव येथे इटकुर येथील दिलीप लोखंडे यांचा गट नंबर 284 हा उद्भव दिलेला असून अंतर 4 कि.मी. असतांना लॉगबुकमध्ये खाडाखोड करुन इटकूर ऐवजी हिरापुर उद्भव दर्शवुन रुपये 76,244/- चे जादा प्रदान केलेले आहे.

6) जिल्हाधिकारी बीड / तहसीलदार गेवराई यांचे आदेशानुसार भाटअंतरवली, शेकटा, चोरपुरी, काळेगांव, मादळमोही, पोखरी, सावरगांव आणि इटकुर या गावांना दिनांक 30/06/2014 पर्यंत तर उमापुर, देवपिंप्री, गुळज, रांजणी आणि धुमेगांव या गावांना दिनांक 31/07/2014 पाणीपुरवठा करणे आवश्यक होते तथापि गटविकास अधिकारी यांनी वरील 13 गावांना दिनांक 31/08/2014 पर्यंत विनापरवानगी पाणीपुरवठा सुरु ठेवल्याने रुपये 19,11,027/- चे अतिप्रदान झालेले आहे.

7) टँकरचे आर सी बुक, आर टी ओ चे क्षमता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. ठेकेदाराने पुरविलेले पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत.

8) वाहनाच्या लॉगबुकात नोंदविलेली अंतरे वाहनाच्या किमी मापक यंत्राच्या रिडींग नोंदविलेल्या नाहीत त्यामुळे योग्य अंतराच्या नोंदी लॉगबुक मध्ये नोंदविल्याची खात्री पटत नाही. उद्भव पाहणीचे संयुक्त पाहणी अहवाल संचिकेत नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रं. टंचाई 3099/प्र.क्र.39/ पापु 14/ दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गांवाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लिटर पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे परंतु टंचाईग्रस्त गांवाच्या लोकसंख्येचे प्रमाणपत्र संचिकेत संलग्न केलेले नाही.

10) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक टंचाई-1002/प्रक्र. 290 /पापु-18 दिनांक 19/9/2002 नुसार टँकर / इतर वाहनाने पाणीपुरवठा व त्याच्या देखभालीसाठी ग्रामपंचायत स्तरावर समिती स्थापन करणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावांत समिती स्थापन केलेचे ग्रामसभा ठराव संचिकेत नाहीत.

**4.335 शासकीय पाणीपुरवठा खाजगी पाणीपुरवठा टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, आष्टी यांनी नैसर्गिक आपत्ती लेखाशिर्ष 2245 अंतर्गत सन 2014-2015 मध्ये खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी रुपये 2,99,61,233/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रदानाची पोच पावती दर्शविलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग निर्णय क्रमांक टंचाई 3099/प्र.क्र.39 पा.पु.14 दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लिटर पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु टंचाईग्रस्त गावाचे तहसिलदार यांचे लोकसंख्येच्याबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक टंचाई-1002/प्र.क्र.290/पापु-18 दिनांक 19/09/2002 नुसार टँकर / इतर वाहनाने पाणीपुरवठा व त्यांच्या देखभालीसाठी ग्रामपंचायत पातळीवर पाणीपुरवठा स्वच्छता समिती स्थापन करणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावात समिती स्थापन केल्याचे ग्रामसभा ठराव संचिकेत नाहीत.

4) टंचाईग्रस्त गावांना पुरविलेल्या वाहनाच्या सुस्थितीचे व क्षमतेचे करारनाम्याप्रमाणे व जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार योगय असल्याबाबतचे तांत्रिक क्षमतेचे परिवहन विभाग किंवा जिल्हा परिषद वाहन विभागाचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

5) पाणीपुरवठा करणा-या वाहनाचे आर सी बुक व टी सी उपलब्ध झाले नाहीत.

6) पाणीपुरवठादारास मंजुरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी ठेकेदारास व ग्राम स्वच्छता व पाणीपुरवठा समितीस पाणीपुरवठाचे वेळापत्रक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. समितीने त्यानुसार पाणीपुरवठा झाल्याचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे अहवाल संचिकेत आढळून आले नाहीत.

7) वाहनाच्या लॉगबुकातील नोंदीवर स्पीडोमिटरच्या नोंदी नाहीत. त्यामुळे प्रदानातील कि.मी. योग्य असल्या बाबतचे खातरजमा करता आली नाही.

8) ठेकेदाराने पुरविलेली पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे देखील संचिकेत नाहीत.

**4.336 विहिर व बोअर अधिग्रहणाच्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पाटोदा, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती पाटोदा यांनी विहिर व बोअर अधिग्रहणासाठी रुपये 17,92,000/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मध्ये पाणीपुरवठा करण्यात आलेल्या अधिग्रहण आदेशामध्ये प्रत्यक्षात पाणीपुरवठयाच्या कालावधी हा सुरुवातीचा/अगोदरचा असताना तहसील कार्यालय पाटोदा यांचे विहिर/बोअर अधिग्रहणाचे आदेश नंतरच्या तारखेचे आहेत. अधिग्रहणाचे आदेश नंतर प्राप्त झालेले असताना आदेशा पूर्वीच विहिर/बोअर अधिग्रहण केल्याचे दिसुन येते. म्हणजेच तहसील कार्यालयाच्या आदेशापुर्वीच पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. विहिर/बोअर अधिग्रहण आदेश प्राप्त होण्यापूर्वीच अधिग्रहण करुन त्या कालावधीचे देयके अदा केली आहेत, त्यामुळे रुपये 7,33,200/- चे अधिक प्रदान झाले आहे.

2) विहिर अधिग्रहण अटी/शर्तीतील अट क्रमांक 1 नुसार पाण्याच्या साठयाबाबत अहवाल अप्राप्त असुन दिवसातुन 18 तास पाणी पुरविणे आवश्यक होते. तथापि त्याबाबत कोणतेच अभिलेखे उपलब्ध नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक टंचाई 1007/प्र.क्र.19/ पापु.-14, दिनांक 27/02/2014 मधील परिच्छेद क्रमांक 01 अन्वये तयार केलेल्या यादीत सदरील गावांचा समावेश असल्याबाबत अधिकृत दस्तऐवज लेखापरिक्षणात तपासणीस मिळाले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1007/ प्र.क्र.19/पापु.-14, दिनांक 27/02/2008 नुसार ग्रामीण भागात पिण्याची टंचाई निवारण होवू नये यासाठी शासनाने ज्या उपाययोजना दिल्या आहेत त्याप्रमाणे उपाययोजना केल्याचे दिसुन आले नाही.

5) सदरील शासन निर्णयातील सुचना क्र.4 अन्वये सदर ग्रामपंचायतीने जलसंधारण व जलपुर्नभरण योजनांचा समावेश असलेला टंचाई प्रतिबंधक आराखडा ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता, सहाय्यक भुवैज्ञानिक यांचे सल्ल्याने तयार केल्याबाबत अधिकृत दस्तऐवज लेखापरिक्षणास प्राप्त झालेले नाही.

6) विहिरीवरुन जर ग्रामस्थांना पाणी दिले असेल तर कोणत्या ग्रामस्थांनी त्याचा दैनिक फायदा घेतला याकरिता त्यांच्या स्वाक्ष-या घेणे अनिवार्य असताना तशा प्रकारच्या स्वाक्ष-या घेतल्या नसल्याचे दिसुन येते.

7) गावातील पाणी टंचाईच्या देयकासोबत त्या कालावधीकरीता तलाठी यांची स्वाक्षरी अनिवार्य असताना ती घेण्यात आली नाही.

8) विहिर अधिग्रहण केल्यानंतर विहिरीतील पाणी नळाद्वारे ग्रामस्थांना देण्याकरिता पुरक पाईपलाईन टाकल्याबद्दल सरपंच/सचिवाने प्रमाणीत केले नाही. त्यामुळे विहिरीतील पाणी गावक-यांना नळ पाणी योजने द्वारे कसे पुरविले याबाबत बोध होत नाही.

**4.337 टंचाईग्रस्त गावांना शासकीय टँकरने पाणीपुरवठा करणेच्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती परळी यांनी शासकीय टँकरने टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करणेसाठी रुपये 2,65,536/- एवढा खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्रमांक 2014/मशाका/कक्ष-3/पिपांट/कावि-54, दिनांक 13/05/2014 अन्वये मौजे सोनहिवरा व मौजे अस्वलंबा या गावांना दिनांक 12/05/2014 ते 30/06/2014 कालावधीसाठी पाणीपुरवठा करणेसाठी मंजुरी देण्यांत आलेली होती. परंतु पंचायत समितीने माहे फेब्रुवारी 2015 पर्यन्त देखील पाणीपुरवठा केला आहे. सदरील अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती परळी यांना त्यांचे कार्यालयीन नोटीस क्रमांक ग्रापापुवि/जिपबी/टंचाई/कावि-758/2502/2014 दिनांक 31/10/2014 अन्वये मौजे सोनहिवरा व अस्वलंबा अंतर्गत धारोबातांडा येथे दिनांक 12/05/2014 ते 30/06/2014 पर्यंत पाणीपुरवठा करणेसाठी मंजुरी दिली होती त्यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती परळी यांनी त्यांचे पत्र क्रमांक पसपं/पाटं/कावि/2727/2014 दिनांक 04/10/2014 अन्वये मौजे सोनहिवरा व धारोबातांडा येथील शासकीय टँकरने होणारा पाणीपुरवठा 01/10/2014 पासुन बंद झाल्याचे तहसीलदार परळी यांना कळवुन सदर पत्राच्या प्रतिलिपी गटविकास अधिकारी परळी यांनी जिल्हाधिकारी बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या आहेत. तथापि गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्षात सदरील शासकीय टँकरने होणारा पाणीपुरवठा सुरु ठेवल्याचे दिसुन येते. प्रमाणक क्रमांक 42 दिनांक 10/02/2015 अन्वये टँकर क्रमांक एमटीबी-3096 साठी पुरविलेल्या डिझेल देयकापोटी झालेल्या रुपये 1,42,830/- या प्रदानामध्ये दिनांक 08/09/2014 ते 28/01/2015 कालावधीमधील डिझेल देयकाचे रुपये 1,22,074/- प्रदान झालेले दिसुन येते.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक टंचाई 3099/प्र.क्र.39 पा पु 14 दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लीटर पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे, परंतु टंचाईग्रस्त गावाचे लोकसंख्येच्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नही.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रमांक टंचाई-1002/पापु-15, दिनांक 19/09/2002 नुसार टँकर / इतर वाहनाने पाणीपुरवठा व त्यांच्या देखभालीसाठी ग्रामपंचायत पातळीवर पाणीपुरवठा

स्वच्छता समिती स्थापन करणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावात समिती स्थापन केल्याचे ग्रामसभा ठराव संचिकेत नाहीत.

4) पाणीपुरवठादारास मंजुरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी ठेकेदारास व ग्राम स्वच्छता व पाणीपुरवठा समितीस पाणीपुरवठाच्या वेळापत्रक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, परंतु समितीने असे कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

5) पाणी उद्भव विहीरीची व टंचाईग्रस्त गावाची गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी संयुक्त पाहणी करणे आवश्यक आहे. परंतू याबाबत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत.

6) वाहनाच्या लॉगबुकातील नोंदीवर स्पीडोमिटरच्या नोंदी नाहीत. त्यामुळे प्रदानातील किमी योग्य असल्याबाबतचे खातरजमा करता आली नाही.

7) प्रपत्र व भुवैजनिक यांनी स्थळ पाहणी करुन प्रत्येक जलस्तोत्र/ उद्भवाचे ठिकाणाचे प्रमाणपत्र संचिकेत आढळले नाही.

8) टँकरव्दारे पुरविलेले पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे देखील लेखे संचिकेत नाहीत.

**4.338 पंचायत समिती परभणी विहीर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, परभणी मध्ये सन 2014-2015 या वित्तीय वर्षात आक्षेपात नमूद केल्यानुसार 14 लाभार्थींना विहीर अधिग्रहणापोटी मोबदला रुपये 1,94,088/- प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 प्रमाणे प्रत्येक जिल्हयात दर वर्षी पावसाळा संपल्यानंतर जिल्हयाच्या वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी संबंधीत भागातील सरासरी वार्षीक पर्जन्यमान, चालू पावसाळयात पर्जन्यमानातील फरक, संबंधीत भागातील निरीक्षण विहीरींच्या माहितीवरुन भूजलाच्या पातळीमध्ये आढळलेला फरक तसेच संबंधीत गावांच्या वाडयांच्या 1.5 किलोमीटर च्या परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दरदिवशी 20 लिटर्सपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता इत्यादी बाबी तपासून या बाबतचे तपशीलवार माहिती प्रपत्र (अ) व (ब) मध्ये तयार करुन ते संबंधीत तहसीलदार व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या संयुक्त अहवालासह जिल्हाधिकारी यांच्या कडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु असे केल्याचे प्राप्त अभिलेख्यावरुन दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 अन्वये सतत 3 वर्षापेक्षा जास्त एकाच विहीरीचे अधिग्रहण झाले असेल तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहीरीची पाहणी करावयाची आहे. पंचायत समिती परभणी यांनी अधिग्रहण केलेल्या विहीरी/बोअर 3 वर्षापेक्षा जुन्या अधिग्रहीत असल्याची माहिती दर्शविली नाही.

3) अधिग्रहण केलेल्या विहीर/बोअर तलाठी, मंडळनिरीक्षका मार्फत विहीर गांवाच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणीत करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत:विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होऊ शकेल याची पाहणी करुन तसे आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र दिलेले दिसून आले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करुन त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

4) विहीर अधिग्रहण केलेल्या कालावधीतील तहसिलदार यांचे आदेशाची तपासणी केली असता विहीर अधिग्रहणाचे बहुतांश आदेश विहीर अधिग्रहीत केल्या नंतरचे आहेत.

5) आक्षेपातील विवरणपत्रातील अनुक्रमांक 1 व 7 च्या विहीर मालकाची अधीग्रहीत विहीरीचे फोटो लेखापरीक्षणात दर्शविण्यात आले. त्यानुसार सदरील विहीरी वरुन गावकरी पाणी भरत असताना चे चित्र दिसून आले. परंतू त्यांना विदयूत मोटारी व्दारे पाणी पूरविण्यात आल्याचे दराप्रमाणे प्रदान केले आहे.

**4.339 पंचायत समिती उपकर मधुन ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, पुर्णा अंतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये मूळ अहवालातील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या तपशीलानुसार पंचायत समिती उपकर मधुन नळ पाणी पुरवठा योजनेसाठी रुपये 20,52,699/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9, दिनांक 15/07/2008 नुसार पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव संचिकेत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करणाऱ्याने स्वाक्षऱ्या करणे आवश्यक आहे. मात्र अनेक बी-1 निविदा कोऱ्या आहेत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 नुसार कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी नमुना 42 मध्ये प्रकल्पाची नोंदवही ठेवुन त्यात नवीन कामाचे सर्व प्रस्ताव नोंदविणे आवश्यक आहे तथापि, अशी नोंदवही ठेवलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना नंबर 69 मध्ये झालेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक आहे परंतु अशी नोंदवही दर्शविली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 67 नुसार विहित नमुना क्रमांक 23 मध्ये कामाची प्रगती नोंदवही लेखासंहिता नियम 97 प्रमाणे परिषदेकडे विहीत केलेली (जमीन खेरीज) सर्व संस्थावर मालमत्ता व रस्ते यांची नोंद विभागाध्यक्षाने अनुक्रमे 39 व 40 मधील स्थावर मालमत्ता नोंदवही आणि रस्ते नोंदवही या मध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदरील नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये नमुना नंबर 48 करारनामा नोंदवही ठेवलेली नाही.

7) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) मधील तरतुदीनुसार देयकांच्या देय रक्कमेच्या 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असताना मूळ अहवालातील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या तपशीलानुसार कामाच्या यादीतील देयकातुन आयकर कपात न केल्यामुळे रुपये 41,177/- चे जादा प्रदान झाले आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2009/प्र.क्र.123/पंरा-7, दिनांक 30/10/2009 अन्वये कामाच्या एकुण मुल्याच्या 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करुन सदरील रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे धनाकर्षाने पाठविणे आवश्यक आहे. परंतु सदरच्या रक्कमा कपात करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रुपये 20,527/- जादा प्रदान झाले आहे.

9) शासन निर्णय क्रमांक जिवर-2000/प्र.क्र.837/35,दिनांक 08/05/2002 अन्वये व विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविसी-2303/सहविमा/जिप/संकीर्ण अभियांत्रिकी/एम-2, दिनांक 27/06/2003 व विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि-1801/सीआर/जिप/संकीर्ण, दिनांक 30/07/2008 अन्वये कंत्राटी कामास प्रारंभ करण्यापुर्वी संबंधित कंत्राटदाराने कंत्राटी मुल्याच्या शेकडा 100 पैसे दराने कामाचा विमा योग्य विमा छत्राखाली विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे उतरविला याची खात्री करावी असे स्पष्ट नमुद आहे. तथापि लेखापरीक्षणात उपरोक्त बांधकामाचे कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार कपात केलेल्या रक्कमा विमा संचालनालयाकडे पाठविणेत आल्याच्या पावत्या व व्हॅट, रॉयल्टी यांच्या कपात केलेल्या रक्कमा पाठविण्यात आलेल्या पावत्या दर्शविण्यात आल्या नाहीत.

10) एका कामासाठी एक मोजमाप वही ठेवण्यात यवी कोणत्याही परिस्थितीत एकाच मोजमापवहीत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी घेण्यात येऊ नयेत व मोजमापवही मधील प्रत्येक नोंदी दिनांकीत असाव्यात असा नियम असताना, अशी कार्यवाही केलेली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेताना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक करारनामा क्रमांक व दिनांक, बांधकाम प्रत्यक्ष पुर्ण करण्याचा दिनांक, मोजणीचा दिनांक इत्यादी तपशील सुरुवातीला नोंदविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तिका तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी करुन मापन पुस्तीकेत स्वाक्षरी केली आहे. परंतु दिनांकीत स्वाक्षरी केली नाही.

13) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 प्रमाणे मोजमाप पुस्तिकेतील मोजमापाचे प्रदान झाल्यावर त्यावर लाल शाईने आडवी रेष ओढुन खोडून टाकणे आवश्यक होते. परंतु सदर कार्यवाही झाली असल्याची मोजमाप पुस्तिका उपलब्ध न केल्यामुळे तपासणी करता आलेली नाही.

14) बांधकामाबाबतचे देयक प्रदानार्थ सादर करताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 186 (1) मध्ये नमुद निर्देशाप्रमाणे अभियंत्यांची देयकांवर प्रतीस्वाक्षरी न घेताच देयकांचे प्रदान केले आहे.

15) अंदाजपत्रकातील बाब निहाय तरतुद व मोजमाप पुस्तिकेनुसार बाबनिहाय केलेल्या कामाच्या नोंदी नुसार तुलनात्मक तक्ता व अंदाजपत्रकानुसार सिमेंटसाठी करण्यात आलेली तरतुद व वापरण्यात आलेले सिमेंट यांचे उप अभियंता यांचे सिमेंट वापर विवरणपत्र घेण्यात आलेले नाही.

16) कामावर करण्यात आलेल्या निधीचे खर्चाबाबतचे उपयोगीता प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध नाही.

17) पंचायत समिती कार्यालयासाठी आर.ओ. फिल्टर, सी.टी.ओ. फिल्टर व वॉटर कुलर खरेदीपोटी रुपये खर्च केला आहे यामध्ये पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत

अ) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुर्णा यांनी प्रमाणक क्रमांक निरंक, दिनांक 01/07/2014 अन्वये मे.साई सेल्स ॲण्ड सर्व्हीस, नांदेड, मे.दर्शन ट्रेडींग कंपनी, नांदेड व मे.सागर सेल्स ॲण्ड सर्व्हीस, नांदेड या तीन दुकानांचे नांव पत्रात नमुद करुन दरपत्रके मागविली. सदरचे पुरवठादार हे तालुका व जिल्ह्याबाहेरील आहेत. तसेच सदरचे पत्रात खरेदी करावयाची साहित्याची दर निश्चिती नमुद करुन दिलेली आहेत. त्यामुळे पुरवठादारामध्ये तुलना होऊ शकलेली नाही. त्यामध्ये वाहतुकीसाठी रुपये 18,000/- नमुद केले आहेत.

ब) तुलनात्मक तक्त्यावर व सीलबंद पाकीटे उघडल्याबाबत फक्त गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुर्णा यांचीच स्वाक्षरी आहे. यासाठी समिती गठीत करुन उचीत कार्यवाही केलेली नाही.

क) तसेच साहित्य जिल्ह्याबाहेरुन खरेदी करणे, दरपत्रक मागणी पत्रात दर निश्चित करुन नमुद करुन देणे वाहतुकीसाठीची रक्कम ठरवुन देणे, सदर खरेदी बाबत यांत्रिकी विभागाचे मार्गदर्शन न घेताच खरेदी केली आहे.

ड) तसेच प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक 74, दिनांक 25/06/2014 मधील अटी व शर्ती या बांधकाम करणेबाबतच्या अटी व शर्ती आहेत. सदरचे साहित्य खरेदी करण्याबाबतच्या नमुद केलेल्या नाहीत.

इ) पुरवठादारा रक्कम रुपये 46,977/- प्राप्तीची नोंदणीकृत पावती न घेता हस्तलिखीत स्वरुपात घेतली आहे. पुरवठादाराने दिलेल्या बीलावर बील नंबर नाही तसेच देय रक्कमेतुन व्हॅट व आयकर कापात केलेला नाही.

**4.340 पंचायत समिती उपकर अंतर्गत हातपंप सुटेभाग खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सोनपेठ, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, सोनपेठच्या सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकर अंतर्गत हातपंप सुटेभाग खरेदीपोटी रुपये 1,74,997/- खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 व 4 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केलेबाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये हातपंप सुटेभाग खरेदीच्या दरास पंचायत समितीने मान्यता दिलेबाबचा ठराव दिसुन आलेला नाही.

3) हातपंप विद्युत पंप देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी जिल्हा परिषदेवर सोपवलेली आहे. त्यामुळे पंचायत समितीने आपल्या स्वत:च्या उत्पन्नातुन हातपंप सुटेभाग खरेदी करणेचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच खरेदीपुर्वी सुटेभाग उपलब्धतेबाबत पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे मागणी किंवा चौकशी केली नाही.

4) जिल्हा परिषदेने ग्रामीण पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती विशेष निधी स्थापन करावयाचा असुन सदर निधीतुन ग्रामीण पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असताना पंचायत समितीने पंचायत समिती उपकरातुन हातपंप सुटेभाग खरेदी केल्यामुळे पंचायत समितीच्या उत्पन्नाची साधने विचारात घेता लोककल्याणकारी योजना राबविण्यात निधी अपुरा पडतो व अशा योजनापासुन लाभार्थी वंचित राहतात.

5) पंचायत समिती कार्यक्षेत्रामधील किती हातपंप/विद्युत पंप नादुरुस्त होते तसेच नादुरुस्त हातपंप/विद्युत पंपा पैकी कोणते हातपंप / विद्युत पंप दुरुस्त करणे गरजेचे होते याबाबतचा परिसर अभियांत्रिकी विभागाचा अहवाल लेखापरीक्षणात दर्शविला नाही. त्यामुळे साहित्य खरेदी योग्य प्रमाणात केल्याबाबतची तपासणी करता आली नाही.

6) नवीन साहित्य हातपंप / विद्युत पंपाला बसविल्यानंतर ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीत त्याची नोंद करणे आवश्यक आहे. परंतु साहित्य बसविल्याबाबत ग्रामपंचायतीची मालमत्ता नोंदवही अथवा ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात दर्शविले नाही त्यामुळे खरेदी केलेल्या साहित्याचा योग्य विनियोग झाला असल्याबाबत प्रमाणित करता येत नाही

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी दर सहा महिन्यानंतर साठा नोंदवहीतील साठ्याची तपासणी करणे आवश्यक असताना अशी तपासणी केली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 अन्वये पुरवठादाराच्या देयकाचे अदाई केल्यानंतर ते विरुपित केलेले नाही.

9) हातपंपाचे नवीन सुटेभाग बसविल्यानंतर जुन्या, निरुपयोगी सुट्या भागांची काय विल्हेवाट लावली याबाबतची निरुपयोगी साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणात दर्शविली नाही.

**4.341 2,24,50,093/- (अभिकरण) योजना - 9 सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी (9 PHE) खाजगी बोअर / विहिर अधिग्रहणावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** पंचायत समिती नांदेडचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 80,800/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पा.पु.-14 मुंबई दिनांक 30/04/2012 नुसार साधन सामग्री उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिदिन रुपये.300/- प्रमाणे रक्कम द्यावयाची आहे.तथापि सदरील प्रकरणी संबंधितास प्रतिदिन रुपये 400/- प्रमाणे अदाई केलेली आहे. साधन सामग्री उपलब्ध करुन दिल्याची कागदोपत्री खात्री पटवावी.अन्यथा जादा प्रदान केलेली प्रतिदिन रुपये 100/- प्रमाणे रुपये 20200/- वसूल करुन शासनाचे योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावी.

2) ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी, ग्रा.प.कामठा (खु.) यांनी संबंधित श्री.प्रभू रामाजी इंगळे यांचे बोअरमधून दिनांक 13/05/2014 ते 28/08/2014 या कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे प्रमाणपत्र दिनांक 30/03/2014 रोजी कसे निर्गमित केले ? याबाबत खुलासा करावा.

3) दिनांक 10/02/2014 रोजी निर्गमित केलेल्या नमुना 7/12 चा उतारा श्री.वसंत शंकरराव हंबर्डे यांचा आहे.परंतु सदरील नमुना 7/12 चे उताऱ्यात बोअर / विहीर असल्याचा उल्लेख नाही. बोअर / विहीर नसतांना अधिग्रहण कसे केले व पाणीपूरवठा कोठून केला याचा बोध होत नाही.

**4.342 2245 - नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खाजगी विहिर अधिग्रहण खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10)** - पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 14,88,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पा.पू.-14 दिनांक 03/02/1999 अन्वये तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करुन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावयाचा आहे. परंतू अशा अहवालाची प्रत सादर न केल्याने टंचाईग्रस्त गावे, वाडी, तांडे, महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 चे कलम 4 अन्वये टंचाईग्रस्त जाहिर केल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 अन्वये सतत 3 वर्षापेक्षा जास्त एकाच विहिरीचे अधिग्रहण झालेले असेल तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी सदर विहिरीची पाहणी करावी परंतू तीन 3 वर्षापेक्षा जून्या अधिग्रहीत विहिरीची माहिती पंचायत समितीने दर्शविली नाही.

3) संचिकेची तपासणी केली असता सोबतच्या 7/12 नुसार संबंधित शेतक-याचे शेतात विहिर / बोअर असल्याचे नोंदी नसतांना विहिर / बोअर अधिग्रहण मोबदला नियमबाहयरित्या प्रदान केला.

4) अधिग्रहण केलेल्या विहिरी, मंडळ निरिक्षक, तलाठी मार्फत विहिर गावाचे सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणित करावयाचे आहे. त्यानतंर तहसिलदार यांनी स्वत: विहिर गावाजवळ असल्याची व पाणीपूरवठा होऊ शकेल याची खात्री करुन तसे आदेशात नमूद करणे आवश्यक आहे. परंतू तसे प्रमाणपत्र दिलेले नाही.

5) विहिर अधिग्रहण संचिकेची पडताळणी केली असता तहसिलदार यांचे विहिर अधिग्रहण आदेश अधिग्रहण केल्यानतंरचे असतांना मागील कालावधीचे अधिग्रहण केलेली रक्कम नियमबाहय ठरते.

6) महाराष्ट्र पाणीपूरवठा अधिनियम 1983 दिनांक 15/04/1983 चे कलम 11 (2) मधील (ब) प्रमाणे प्रत्येक व्यक्ती अथवा कुटूंब यांना किती पाण्याची आवश्यकता आहे. याची परिगणना करुन याबाबतचे अहवालानूसार पाण्याचे स्त्रोत निश्चित करुन तशा प्रकारचा अहवाल प्रमाणकासोबत जोडला नाही. त्यामूळे अधिग्रहण केलेल्या विहिरीतून गावास योग्य प्रमाणात पाणीपुरवठा झाला याची खात्री पटत नाही.

**4.343 हातपंप व विद्युतपंप दुरुस्ती वर्गणीची थकबाकीची रक्कम ग्रामपंचायती कडुन वसुलीबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात हातपंप विदयुत पंप वर्गणीपोटी दिनांक 31/03/2015 अखेर एकुण रक्कम रुपये 19,32,231/- थकबाकी वसुल होणे बाकी असल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक देप्रोअ-1309/प्र.क्रमांक.69/पापु07,दिनांक 29/09/2009 नुसार प्रती हातपंप रुपये 1,000/- व प्रती विद्युतपंप रुपये 5,000/- प्रति वर्ष वसूल करुन प्रत्येक ग्राम पंचायत बरोबर करारनामा करणे आवश्यक आहे. करारनामा करून त्यानुसार प्रत्येक ग्राम पंचायत कडुन रक्कम प्रथम वसूल केलेली नाही. ग्रामपंचायतकडे याबाबत ग्रामसेवकांच्या नियतकालीक बैठकीत पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना नंबर 8 व 9 मध्ये मागणी वसुली व थकबाकी नोंदवही ठेवण्यात येवून त्यामध्ये वर्षनिहाय व ग्रामपंचायत निहाय नोंदी घेण्यात येवून वर्ष अखेरीस थकबाकी नोंदवून पुर्ण करावी. तथापी अशी कार्यवाही पंचायत समितीकडुन करण्यात आलेली नाही.

**4.344 टंचाई अंतर्गत बोअर / विहिर अधिग्रहण खर्चातील अनियमिततावाबत.**

**पंचायत समिती उमरी, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती उमरीचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 7,48,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्रीमती रेणूका शिवाजी रा. हिरडगांव, श्री. गंगाराम राजाराम शिंदे रा. सावरगांव (द), श्री. वडजे रा. नागठाणा खूर्द, श्री. रमेश बाळू राठोड रा. गोकूळनगर, अस्वलदरी यांनी पाणीपूरवठा केल्याबाबतचे ग्रामपंचायतींचे प्रमाणपत्रावर दिनांक नमुद नसतांना त्यांना असे एकूण रुपये 1,21,200/- चे नियमबाहय प्रदान केले आहे.

2) संचिकेत पाणीपूरवठा करणा-या व्यक्तीचे करारनाम्याचे मुद्रांक पेपर आहेत. सदर मुद्रांक पेपरवर करारनामा करुन घेण आवश्यक असतांना श्री. गंगाराम रामजी शिंदे, श्री. मारोती रामजी सिंधीकर, श्री. पंडीत मारोतीरव जाधव, श्यामेश्वर बाळू राठोड यांच्या करारनामा पेपरवर स्वाक्ष-या नाहीत.

3) करारनामा मुद्रांक पेपरवर गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन साक्षांकित केला नाही.

4) श्री. गोपाळ विठठल निळेवार यांना दिनांक 01/04/2014 ते 27/08/2014 या कालावधीचे एकूण 149 दिवसांचे देयक अदा केले आहे परंतू दिनांक 01/07/2014 ते 27/08/2014 या कालावधीतील तहसिलदार यांचे अधिग्रहणाचे आदेश संचिकेत आढळले नाहीत. त्यामूळे सदर कालावधीत पाणीपूरवठा करणेबाबत खात्री पटली नाही. त्यामूळे दिनांक 01/07/2014 ते 27/08/2014 या कालावधीच्या एकूण 58 दिवसांची प्रति दिवस 400 प्रमाणे प्रदान करण्यात आलेले रुपये 23,800/- संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.